# प्राचीन जैनाचार्य

प्रा. सौ. लीलावती सुमेरचंद जैन

---------------------------------------------------------------------------------------------

## आगम परंपरेचे पाईक

## आचार्य पुष्पदंत व भूतबली

जैन आचार्य परंपरेमध्ये आचार्य पुष्पदंत व आचार्य भूतबली यांचे फार महत्वाचे स्थान आहे . कारण आगमग्रंथाच्या निर्मितीत त्यांचा फार मोठा सहभाग आहे .

आचार्य धरसेन हे आगमग्रंथाचे प्रगाढ पंडित आणि ज्ञाते होते . त्यांना सर्व ग्रंथ कंठस्थ होते . पण वय झाले आणि त्यांची चिंता वाढली . आपले हे ज्ञान कोणाला द्यावे ? एवढे प्रचंड ज्ञान ग्रहण करण्याची पात्रता असणारा शिष्य कसा मिळणार ? या विचारांनी ते व्यथित झाले होते आपल्यानंतर या कंठस्थ श्रुतज्ञानाचे काय होणार , हा विचार त्यांना व्याकुळ करीत होता . त्यावेळी आचार्य धरसेन सौराष्ट्र देशातील गिरनार येथील चंद्रगुहेत निवास करीत होते . त्यांच्या शिष्यापैकी त्यांच्याजवळचे श्रुतज्ञान ग्रहण करण्यास योग्य असा शिष्य नसल्यामुळे ते व्यथित होत

त्याचवेळी त्यांना कळले की आंध्र प्रदेशातील *महिमानगरी* येथे मुनीसंमेलन होणार आहे . त्यासंमेलनात अनेक ठिकाणचे मुनिसंघ येणार होते . धरसेनाचार्यांनी त्या मुनीसंमेलनास पत्र पाठवून दोन प्रज्ञावंत अशा तरू ण मुनींना पाठविण्यास सांगितले . धरसेनाचार्यांचे हे पत्र पोहोचताच मुनीसंघालाही पटले की श्रुतज्ञानाची जपणूक केलीच पाहिजे . नाहीतर धरसेनाचार्याबरोबर हे आगम ज्ञानही नष्ट होईल . म्हणून त्यांनी नीट पारख करू न पुष्पदंत आणि भूतबली या साधूंची निवड केली आणि धरसेनाचार्यांकडे पाठविले .

ते दोघे गिरनारला पोहोचल्यावर आचार्य धरसेनांनी त्यांची कसून परीक्षा केली ; त्यांनी एकाला हीनाक्षरी व दुस-याला अधिकाक्षरी मंत्र देऊन देवीची आराधना करण्यास सांगितले . सहा उपवास करू न देवीला प्रसन्न करू न घेण्याची आज्ञा दिली . त्यावेळी एकाला एक मोठा दात असलेली व दुस-याला एकच डोळा असलेली देवी दिसली . तेव्हा दिलेल्या मंत्रात काहीतरी

चूक असावी याची त्यांना जाणीव झाली . तेव्हा त्यांनी तो मंत्र दुरुस्त केला . तेव्हा त्यांना सौम्य आणि प्रसन्न अशा देवीचा साक्षात्कार झाला . तेव्हा दोघेही शिष्य विद्या ग्रहण करण्यास योग्य आहेत असे त्यांच्या ध्यानात आले . ते प्रसन्न झाले आणि त्यांनी दोघांकडून सर्व सूत्रे पाठ करून घेतली . त्यांचा हा श्रुतज्ञानाचा अभ्यास आषाढ शुद्ध एकादशीला संपला . त्याचवेळी भुतांनी एका शिष्याची पुष्प , शंख तूर्य इ. नी पूजा केली . तेव्हा आचार्यांनी त्याचे नाव भूतबळी ठेवले व दुस-याचे वाकडे दात सरळ आणि सुंदर केले म्हणून त्याचे नाव पुष्पदंत असे ठेवले . पावसाळा निकट आल्याचे पाहून आचार्यांनी दोन्ही शिष्यास परत पाठविले . आचार्यांना आपला अंत्यसमय जवळ आला आहे याची जाणीव झाली होती .

पुष्पदंत आणि भूतबली नंतर *अंकुलेश्वर* येथे गेले . तेथे त्यांनी चार्तुमास केला . चातुर्मासानंतर पुष्पदंतमुनी *वनवास* येथे गेले . तेथे त्यांनी जिनपालित या शिष्याला दिक्षा दिली व ‘ बीसदी ’ सूत्रांची रचना करू न त्याला भूतबलीकडे पाठविले . पुष्पदंताचे आयुष्य थोडेच उरले आहे , हे भूतबलींनी जाणले . आणि ग्रंथरचना पूर्ण केली . त्या ग्रंथालाच
‘ *षट्खंडागम* ’ असे नाव दिले गेले .

आ . पुष्पदंत व भूतबली याचे शिक्षागुरू धरसेनाचार्य होते . पण त्यांचे दीक्षागुरू कोण होते याचा उल्लेख कोठेही आढळत नाही . धरसेनापूर्वी तीन केवली , ५ श्रुतकेवली , ११ दशपूर्वी , ५ एकादशांगधारी आणि ४ आचारांगधारी आचार्य होऊन गेले . यांच्यानंतर समस्त अंगाचे आणि एका दहा पूर्वीचे ज्ञान आचार्य धरसेनाना होते . धरसेनांनीच आचार्य पुष्पदंत व भूतबली यांना शिक्षित केले . त्यानंतर वनवास येथे त्यांना जिनपालित नावाचा शिष्य मिळाला . तो पुष्पदंताचा भाचा होता असे म्हणतात . पण साधूंच्या आचाराच्या दृष्टीने भाच्याला भेटायला वनवास येथे जाणे उचित वाटत नाही . आचार्य पुष्पदंत हे भूतबलीपेक्षा वयाने मोठे होते . धवलाकारांनी मंगलाचरणात त्यांना प्रथम नमस्कार केला आहे आणि त्यांना ‘ इसि समिई वइ ’ ( ऋषि-समिति-पति ) म्हणजे मुनिसभेचा नायक म्हटले आहे . श्रवण बेळगोळ येथील शिलालेखात भूतबली हे अर्हतबलीचे शिष्य आहेत असा उल्लेख आढळतो . धवलाकारांच्या टीकेत भूतबलींना प्रथम वंदन केले आहे . त्यामुळे ते पुषदंतापेक्षा मोठे असावेत , आणि नंदी आन्मायाच्या पट्टावलीवरू न त्यांचा काळ वीर निर्वाणानंतर ६१४ ते ६८३ हा असावा असा अंदाज आहे .

त्यांनी लिहिलेल्या षट्खंडगमात एकूण सहा खंड आहेत . त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत . *१) जीवट्ठाण २) खुद्दाबंध ३) बंध-स्वामित्व ४) वेदना ५) वर्गणा ६) महाबंध .*

१) जीवट्ठाण - या प्रथम खंडात सत् , संख्या , क्षेत्र , स्पर्शन , काळ , अंतर , भाव व अल्पबहुत्व हे आठ अनुयोगाद्वारे असून प्रकृति , जघन्यस्थिती , उत्कृष्ट स्थिती , गति-आगति इ. चूलिका आहेत.

२) खुद्दाबंध - याला क्षुल्लकबंध असेही म्हटले आहे . यात ११ अधिकार आहेत . स्वामित्व , काल अंतरभंग-विचय , द्रव्य -प्रमाणानुगम , क्षेत्रानुगम , स्पर्शनानुगम , नानाजीवकाल , नानाजीवअंतर , भागाभागानुगम् , अल्पबहुत्वानुगम अशी त्यांची नावे आहेत . यात कर्मबंध करणा-या जीवांचे कर्मबंधाच्या प्रकारासहित वर्णन आहे .

३) बंधस्वामित्वनिचय - कोणत्या प्रकृतीचा कोणत्या जीवाला किती
बंध होतो , याचे वर्णन असून बंधरू प प्रकृती किती आहेत , याची माहिती दिली आहे .

४) वेदना - यात मंगलाचरण पुन: घेतले असून वृत्ति आणि वेदना हे अनुयोगद्वार यात येतात . वेदनेची प्रधानता यात असल्यामुळे याला वेदना खंड म्हटले आहे . कृतीचे नाम , स्थापना , द्रव्य , गणना , ग्रंथ , करण भाव हे सात प्रकार असून वेदनेचे निक्षेप , नय , नाम , द्रव्य , क्षेत्र , काळ , भाव , प्रत्यय इ. १६ अधिकाराद्वारे वर्णन केले आहे .

५) वर्गणा - २३ वर्गणांचे वर्णन असून , कर्म , स्पर्श , प्रकृती आणि बंधनाचे प्रथम , भेद बंध या अनुयोगद्वाराचा अंतर्भाव केला आहे .

६) यात तीस हजार सूत्रे आहेत . प्रकृतिबंध , अनुभागबंध व प्रदेशबंधाचे वर्णन आहे .

७) वरील सहा खंडांनी षट्खंडागम ग्रंथाची रचना केली आहे .

या ग्रंथावर अनेक विद्वान आचार्यांनी टीका रचल्या आहेत . षट्खंडागमावरील विविध प्रकारच्या व विद्वान आचार्यांनी लिहिलेल्या टीका पाहून ग्रंथाचे महत्व कळते . धरसेनाचार्यांकडून विद्या ग्रहण करू न त्यांना लिपीबद्ध करण्याचे काम करणारे आ. भूतबली आणि पुष्पदंत यांनी करू न जैन लोकांवर अनंत उपकार केलेत , यात शंका नाही .

# आचार्य श्री वीरसेन स्वामी

भ . महावीरांच्या निर्वाणानंतर गणधर श्री गौतम , श्री लोहार्य गणधर , श्री जम्बुस्वामी गणधर असे तीन केवली भगवंत झाले . त्यानंतर आचार्य विष्णु , आचार्य श्री नंदिमित्र , श्री अपराजित , श्री गोवर्धन व श्री भद्रबाहू हे पाच श्रुत-केवली झाले . तीन केवली भगवान ६२ वर्षात , व पाच श्रुत केवली १०० वर्षात झाले . पुढील १८३ वर्षात अकरा आचार्य दहा पूर्वीचे ज्ञाते , पुढील २२० वर्षात पाच ११ अंगाचे ज्ञाते , पुढील ११८ वर्षात चार आचार्य एक अंगाचे ज्ञाते झाले . म्हणजे भ . महावीरांच्या निर्वाणानंतर ६८३ वर्षे संपल्यावर आचार्य श्री धरसेनांच्या प्रेरणेने , भगवान महावीरांची वाणी , ग्रंथरू पात कशी प्राप्त झाली , याचा इतिहास जाणून घेणे , आवश्यक आहे .

## इतिहास

एके दिवशी आचार्य धरसेनांच्या मनात विचार आला की त्यांच्याजवळ जे मौखिक स्वरू पात , गुरू परंपरेने आलेले ज्ञान आहे , ते कुणातरी योग्य , प्रज्ञासंपन्न मुनींना द्यावे , त्याप्रमाणे आंध्र प्रदेशात असलेल्या संघप्रमुख आचार्यांना निरोप पाठवून , दोन युवा मुनींना पाठविण्याचे कळविले . तेव्हा त्या संघातून पुषदंत व भूतबली या दोन अत्यंत प्रज्ञावान् व ज्यांची स्मरणशक्ती तीव्र आहे अशांना , त्या संघ प्रमुखांनी आचार्य श्री धरसेनाकडे पाठविले . त्यावेळी आचार्य धरसेन गिरनार ( सौराष्ट्र ) येथे चंद्रगुफेत निवास करीत होते . तेथे पुष्पदंत व भूतबली गेले . तेथे त्यांची सर्व प्रकारे परीक्षा करू न आचार्य धरसेन यांनी धवला , जयधवला व महाधवला यांचे ज्ञान दिले . त्यानंतर ते दोघे परतताना *अंकलेश्वर* ( भडोच - गुजराथ ) येथे चातुर्मासासाठी थांबले . नंतर तेथून पुष्पदंत आचार्य हे कर्नाटकातील वनवास या गावात आले . आचार्य भूतबली मद्रासकडील भागात निघून गेले . त्या दोघाही आचार्यांनी मिळून षट्खंडागमाच्या आधाराभूत सूत्रांची लिखित स्वरू पात रचना केली . सुरू वातीचा भाग हा वयाने ज्येष्ठ असलेल्या आचार्य पुष्पदंतांनी व पूर्णता आचार्य श्री भूतबली यांनी केली . ते ग्रंथ म्हणजे धवल , जयधवल होत . त्या ग्रंथांची रचना पूर्ण करू न ज्येष्ठ शुक्ल पंचमीच्या दिवशी संघामध्ये त्या ग्रंथांचे श्रुतपूजन करण्यात आले .

ते सारे आगम ग्रंथ अत्यंत दुर्गम , समजण्यास कठीण होते . विषयही अपरिचित व गणिती होता . अशा परिस्थितीत अनेक आगम ग्रंथांचे ज्ञाते , अभ्यासू , तत्वचिंतक , निर्ग्रंथ गुरू श्रेष्ठ श्री वीरसेन स्वामीनी या ग्रंथावर सुबोध टीका लिहून जिनशासनाचा महत्वपूर्ण ग्रंथ सर्वांसाठी लिहून सर्व भारतीयावर फार मोठे उपकार केले आहेत , यात शंकाच नाही . खेदाची गोष्ट अशी की आचार्य वीरसेनांच्या मातापित्यांची व जन्मस्थळाची माहिती मिळत नाही . जैन निर्ग्रंथ ग्रंथकार अशी माहिती देत नाहीत . कदाचित् पूर्वाश्रमीची माहिती देणे मुनिधर्मात बसत नसावे . सांसारिक गोष्टी देण्यात त्यांना रस नव्हता , हेच खरे .

या षट्खंडागमाचे रचनाकार , आचार्य श्री वीरसेन स्वामी होते . एलाचार्य त्यांचे विद्यागुरू होते व दीक्षागुरू आर्यनंदी नावाचे आचार्य होते . त्यावेळी जैन संघात आगमांच्या अध्ययनाबरोबर जैन गणित , भूगोल , ज्योतिष्य , काव्य , भाषा , विज्ञान यांचाही अभ्यास होत असे . जिनवाणी मातेची सेवा करण्यात उभा जन्म घालविणारी अभ्यासू , तत्वचिंतक पीढी संघामध्ये असे . तर्क व व्याकरणाच्या निकषावर आगमांचे परिशीलन व अध्ययन चालत असे , असे दिसून येते . दीर्घायुषी पीढी असल्याने त्यांचे अध्ययन परिपक्व स्थितीत झालेले असे . एकाहून एक सरस विद्वान मंडळी , त्या संघात असल्याचे दिसून येते . आचार्य वीरसेन अनेक भाषांचे ज्ञाते , तर्क-व्याकरण-न्यायशास्त्रज्ञ , समाजधुरीण व बहुश्रुत असल्याचे त्यांनी लिहिलेल्या टीकेवरू न दिसून येते . त्यांच्या विशाल ज्ञान भांडारात अनेक ग्रंथ विद्यमान होते व त्या सर्वांचा सापेक्षतेने , रसिकतेने व प्रज्ञेने त्यांनी उपयोग करू न घेतला आहे . त्यांच्या आगमनाबद्दल असे म्हटले आहे -

“ वीरसेनांचे शासन हे चंद्रप्रकाशाप्रमाणे शीतल आहे , शांतीप्रदान करणारे आहे , मिथ्यात्वाचा नाश करणारे आहे , जे बुद्धीच्याही व कल्पनेच्याही पलिकडचे आहे , त्याचा आपल्या बुद्धीने , प्रज्ञेने , अचिंत्य अशा ज्ञानचेतनेने शोध घेऊन सुसूत्रपणे मांडणी करणारे ते जणु केवलीप्रमाणच आहेत . ( साक्षादिव स केवली ) आजवरच्या सर्व लिखित ग्रंथात त्यांचा षट्खंडागम हा ग्रंथ गुरु त्वाला ( मोठेपणाला ) प्राप्त होऊन तो ग्रंथ ‘ ग्रंथरत्न ’ पदवीला प्राप्त झाला आहे . सर्व अर्थाला वेढून राहणारी त्यांची निसर्गदत्त प्रतिभा म्हणजे इहलोकीचा चमत्कार आहे . त्यांची भारती

( वाणी -ग्रंथ ) षट्खंडाला जिंकणा-या चक्रवर्तीप्रमाणे आहे . ”

त्यांनी आपल्या त्या टीकेला धवला , जय धवला , महाधवला अशी सुंदर नावे दिली . धवल कीर्तीने ज्यांनी अर्हंताच्या आगमसूत्रांना यथार्थ अर्थ या कलियुगात प्राप्त करू न दिला ते वीरसेन आचार्य सदा जयवंत असोत !

आदिपुराणाच्या उत्थानिकेत त्यांना त्यांच्या शिष्याने विनम्रपणे पूतात्मा , वादिवृन्दारक , लोकदर्शी , कवींद्र , वाग्मि , वाचस्पती असे म्हटले आहे . ही सारी विशेषणे देखील थिटी वाटावीत अशा प्रचंड ज्ञान-वटवृक्षाप्रमाणे , श्री वीरसेन स्वामी आहेत . त्या वीर संतांनी चित्रकूटपुरवासी श्री एलाचार्यांच्या जवळ विद्याध्ययन केले होते . ते एलाचार्य सिद्धान्त-तत्वज्ञ होते . आगम-परमागमांचे ज्ञाते , चिकित्सक अभ्यासी व चिंतक होते .

धवला टीका लिहिण्याची प्रेरणा -

आचार्य भूतबली व आचार्य पुष्पदंतांनी जे आगम महत् प्रयासाने ग्रंथारू ढ केले होते , ते सुगम व्हावेत , सा-यांना कळावेत म्हणून आचार्य एलाचार्य यांनी त्यांना प्रेरणा दिली . ते म्हणाले , “ वत्स , आपले अध्ययन झाले आहे . त्या जिनवाणीचे ऋण फेडायचे तर षट्खंडागमावर टीका लिहून , ती आगमे सुगम करावीत . ती शक्ती , ते सामर्थ्य आपल्यात विद्यमान आहे . ”

त्याप्रमाणे आचार्य वीरसेनांनी गुरूं ची आज्ञा प्रमाण मानून , षट्खंडागमावर टीका लिहिण्याचे ठरविले . ते काम अत्यंत जिकिरीचे होते , कष्टप्रद होते . किती काळ लागेल याचा अंदाज नव्हता . एकट्याने शक्य होईल की नाही , याची खात्री नव्हती . त्यांनी संघातील श्रेष्ठतम प्रज्ञावान मुनी श्री जिनसेन यांना निवडले . त्या मुनींचे संस्कृत-प्राकृत या भाषांवर प्रभुत्व होते . श्रेष्ठ कवींना , साहित्यकारांना लागणारी प्रतिभा त्यांच्यात होती . केवळ जैनशास्त्रांचेच नव्हे तर इतर भारतीय संस्कृत-प्राकृत ग्रंथांचे अध्ययनही त्यांनी केले होते . नाट्य , काव्य , महाकाव्य यांचा त्यांना अभ्यास होता . दैदिप्यमान प्रज्ञेच्या जोरावर त्यांनी लहान वयातच चारही दिशांना प्रकाशित करणा-या बाल-सूर्याचे तेज प्राप्त केले होते . सरस्वतीचा वरदहस्त व आचार्य वीरसेनांचे आशीर्वाद त्यांना लाभले होते .

धवला-टीकांची सुरू वात करण्यापूर्वी उपलब्ध ताडपत्रीवरील ग्रंथ संपदा त्यांनी जमविली . त्या ग्रंथांची नावे जरी पाहिली तरी मन थक्क होऊन जाते . कारण आज हे ग्रंथ मिळविणे दुर्लभ आहे , तर ज्यावेळी प्रकाशनाची , छपाईची , कागद उपलब्धीची सोय नव्हती , त्यावेळी जैन शासनातील उत्कृष्ट ग्रंथांचा संग्रह केला व त्यांचा उपयोगही टीकेसाठी केला . एका गावाहून दुस-या गावाला जाणा-या निग्रंथ साधू व जवळ पिच्छी-कमंडलू शिवाय काहीही न बाळगणारे मुनी - केवळ दुर्दम्य आशेने , जिद्दीने षट्खंड आगमावर टीका लिहायला उद्यत झाले . ज्या दिवशी त्यांनी हा निर्णय केला तो दिवस , तो क्षण जिनवाणीच्या जीवनातला भाग्यक्षण ठरला . त्यांनी त्याही काळात खालील ग्रंथांचा उपयोग केला व तसे संदर्भ धवला-टीकेत दिले . त्यातले काही ग्रंथ आज उपलब्ध नाहीत १) सतकर्म प्राभृत २) कषाय प्राभृत ३) सिद्धसेनांचे सन्मतितर्क४) अकलंक देवाचे तत्वार्थ राजवार्तिक ५) कुंदकुंदांचे प्रवचनसार , पंचास्तिकाय ६) जयसेन आचार्यांनी कुंदकुंदाच्या ग्रंथावर लिहिलेले टीका ग्रंथ . ७) तिलोयपण्णती ८) वट्टेकर यांचे मूलाचार ९) अकलंकांचे लघीयस्त्रयी १०) मूलाराधना

११) वसुनंदीश्रावकाचार १२) प्रभाचंद्रांचे शाकटायन-न्यास १३) देवसेनांचे नयचक्र १४) विद्यानंदीचे आप्तपरीक्षा , १५) आ. नेमिचंद्र यांचे जीवकाण्ड-कर्मकाण्ड १६) श्वेतांबरांनी स्वत:चे कल्पिलेले असे ग्रंथ-आचारांग , बृहतकल्पसूत्र , दशवैकालिक , स्थानांग , अनुयोगद्वार , आवश्यक निर्युक्ती . अशा रीतीने तत्कालीन प्रमुख व मान्य अशा ग्रंथांची जमवाजमव , त्यांचे सूक्ष्म वाचन , मनन व संदर्भासाठी त्यांचा वारंवार उपयोग करणे व मुळातून आचार्य पुष्पदंतांनी व आचार्य भूतबलींनी जी सूत्रे एकत्र केली होती , त्यांची मांडणी व सुंदर रचना केली होती , त्यावर भाष्य लिहिण्याचे अत्यंत अवघड कार्य श्री वीरसेनांनी पूर्ण केले . जे सूत्रग्रंथ होते , त्यांच्याही वेगवेगळ्या आवृत्त्या होत्या . त्यातून शुद्ध पाठ शोधणे व तो कायम करणे , हे अवघड होते .कारण सूत्रे हा भाग भ. महावीरांपासून परंपरेने चालत आलेला . ते शुद्ध करू न स्वीकारणे अत्यंत जबाबदारीचे होते . पूर्वपरंपरेचे भान ठेवून व जैन आगमांची प्रामाणिकता , यथार्थता टिकवून सूत्रांची निवड करणे जरुरीचे होते . प्रती-प्रतीमध्ये नकल करणा-यांचे प्रताप दिसून येत होते . सूत्रात तर काना-मात्रा , -हस्व-दीर्घ यांचे फार महत्व असते . पूर्ण विरामाचा दंडक चुकला तर अर्थाचा अनर्थ होण्याची भिती होती . शिवाय श्वेतांबरांनी ‘ वाचना ’ परिषद भरवून मुळात नसलेल्या अनेक सूत्रांची व श्लोकांची भर घातली होती . त्यातून महावीरांच्या पासून चालत

आलेले पाठ व घुसडलेले पाठ शोधणे म्हणजे , एक दिव्य कामच होते . परंतु आचार्य वीरसेनांनी तब्बल ३० वर्षे त्या ग्रंथांच्या टीकेसाठी ( धवलासाठी ) वेचली . सारे आयुष्य जिनवाणीच्या जीर्णोद्धारासाठी खर्च केले . किती हे जिनवाणीचे प्रेम ! तारुण्य उलटून गेले , गात्रे शिथिल झाली . दृष्टी मंदावत चालली , तरी आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत अखंडपणे धवलाची टीका लिहिणे चालूच राहिले होते . कारण , सूत्रात देखील एकमत नव्हते . काही विरोधी मतांची नोंदही त्यांनी प्रामाणिकपणे धवला टीकेत केली आहे . व त्या विरोधी सूत्रांना मूळ परंपरेशी जोडून दिले आहे . जेथे ते शक्य झाले नाही तेथे दोन्ही मते मांडून निवादा पुढील अभ्यासूवर सोडला आहे . संशोधन , समीक्षण , निवेदन , मांडणी , रचना यांची एतकी सुंदर , अप्रतिम सांगड घातली आहे की पाश्चिमात्य विद्वानही चकित झाले आहेत .

अशा सुंदर ग्रंथाची रचना जवळ जवळ ७०-८० हजार श्लोकप्रमाण भरेल . कुठेही प्रमाद नाही . प्रश्नांची तड लागेपर्यंत , आचार्य स्वत:च प्रश्न निर्माण करतात व स्वत:च सप्रमाण उत्तर देतात . ते करताना इतकी सूक्ष्मता आढळते की , ते स्वत: अडचणीत येतात . मग या प्रश्नाचे उत्तर आता ' ' 'गौतम गणधरांना' विचारावे , असा सल्ला देतात . प्रश्न कसे निर्माण करावेत व ते कसे सोडवावेत हे आचार्यांकडून शिकावे . आपल्या उभ्या आयुष्यात ३० वर्षे त्यांनी केवळ धवलासाठीच खर्च केली . वर्षात तीन हजार श्लोक़ होतील एवढे गद्य व पद्य त्यांनी रचले . भाषा तर इतकी मधाळ , रसाळ , ओघवती व स्पष्ट आहे की कुणीही रसिक 'मानतो आचार्यांना'असे म्हणेल .

रचनास्थळ व काल

आचार्यांनी एवढे मोठे कार्य कुठे केले , केव्हा केले असेल , याबाबत ऐतिहासिक संशोधनपूर्वक डॉ. हिरालाल जैन व डॉ. ए. एन. उपाध्ये यांनी धवलाच्या प्रस्तावनेत संपूर्ण माहिती दिली आहे . वेगवेगळ्या ग्रंथांच्या प्रशस्ती , ताम्रपट , शिलालेख व प्रत्यक्षात स्वत: श्री वीरसेन आचार्यांनी ग्रंथात केलेले उल्लेख व उल्लेखांची , आधुनिक कालनिर्णय तंत्राच्या सहाय्याने तपासणी केली . त्यावरू न त्यांचे निष्कर्ष असे - आचार्य श्री वीरसेन यांनी ही धवला टीका ( सूत्रार्थ दर्शिनी ) वाटग्रामपुर येथील मंदिरात मान्यखेट येथे , ( मलखेड-गुलबर्गा जवळ )

राष्ट्रकूट नरेश अमोघवर्ष ( पहिला ) हा राज्य करीत असता , शक संवत ७३८ ते श. सं. ७८८ त्याच्या राज्याच्या कारकीर्दीची २३ वर्षे पूर्ण झाल्यावर , पूर्ण झाली . फाल्गुन मास , दशमी , शुक्लपक्ष असा दिनांकही धवला , टीकेच्या शेवटी दिला आहे . म्हणजे ८ ऑक्टोबर इ. स. ८१६ या दिवशी हा ग्रंथ पूर्ण झाला .

अशा रीतीने आचार्य श्री वीरसेनांनी महाभारत या १ लाख श्लोक असलेल्या ग्रंथावरही ताण केली आहे . कारण महाभारतातील १ लाख श्लोक मूळचे नाहीत . त्यात अनेक हजार श्लोक नंतर प्रविष्ट करण्यात आले आहेत . त्यांची धवला टीका अपूर्ण राहिली होती , ती त्यांचे परमश्रेष्ठ शिष्य श्री जिनसेन स्वामी यांनी पूर्ण केली .

धवला नाव का ?

या टीकेला धवला नाव का दिले , असाही प्रश्न पडतो , त्यांची कारणे म्हणजे ही धवला टीका , अत्यंत पवित्र , निर्मल व शुक्लेंदु प्रमाणे आहे . दुसरे , त्यावेळी जो अमोघवर्ष राजा राज्य करीत होता त्याचे एक बिरुद ( उपाधी ) अतिशय-धवल अशी सापडते . हा राजा अत्यंत धर्मनिष्ठ होता . आपल्या वृद्धापकाळात त्याने राज्यत्याग करू न जिनदीक्षा घेऊन समाधिमरण-पूर्वक देह त्याग केला होता . म्हणून त्या राजाचा ऋणनिर्देशही होतो . मराठीत ‘ढवळे’ नावाचे काव्य सापडते . ‘ ढवळणे ’ असे एक क्रियापदही दिसते . लोणी काढताना ढवळून काढावे लागते . तसेच आचार्यांनी सूत्रांना ढवळून काढून धवलारू पी नवनीत सादर केले , असा अभिप्राय दिसतो .

ह्या टीका - ग्रंथापूर्वी देखील आचार्य कुंदकुंद यांनी पहिल्या तीन खंडावर परिकर्म ( कर्म-प्राभृत ) नावाची , बारा हजार श्लोक प्रमाण टीका लिहिल्याचा उल्लेख , इंद्रनंदीच्या श्रुतावतार या ग्रंथात आढळतो . परंतु तो ग्रंथ सापडत नाही . तरी धवला टीकेत परिकर्म टीकेचा वारंवार आदराने संदर्भ घेतला गेला आहे . ती टीका प्राकृत-संस्कृत व कन्नड मिश्रित होती . आचार्य शामकुंद ( शामकुंड ) यांनी व आचार्य श्री तुंबलूर यांनी अनुक्रमे ‘ ‘ ‘ ‘पद्धति’ व ‘पंचिका’

अशा टीका लिहिल्याचे उल्लेखही सापडतात . परंतु आचार्य वीरसेनांच्या इतकी परिपूर्ण , निर्दोष व सर्वार्थवाही टीका दुसरी उपलब्ध नाही . त्यानंतर आचार्य श्री समंतभद्रस्वामी यांनी पाच खंडावर ४८ हजार श्लोक-प्रमाण टीका लिहिल्याचेही दिसून येते . ती उत्तम संस्कृत भाषेत होती . त्याचाही संदर्भ वीरसेन स्वामींनी आपल्या धवला टीकेत घेतला आहे . पण आज कोणताही ग्रंथ ( धवलाशिवाय ) सापडत नाही .

अशा रीतीने आचार्य वीरसेन स्वामींनी जी धवला टीका लिहिली , त्याला भारतीय साहित्यात तोड नाही . इतक्या विपुल प्रमाणात व अद्वितीय स्वरू पात अन्य कोणताही ग्रंथ उपलब्ध नाही . आचार्यांचे हे धवला ग्रंथ मूडबिद्री ( दक्षिण कॅनरा ) येथील भट्टारकांच्या ग्रंथभांडारात हजार-बाराशे वर्षे बंदिस्त होते . केवळ दर्शनासाठी शेकडो रुपयांची दक्षिणा द्यावी लागत असे . परंतु श्री. शेठ माणिकचंद पानाचंद मुंबई , शेठ श्री. हिराचंद नेमचंद , सोलापूर , शेठ श्री. लाला जंबुप्रसादजी सहरानपुर ( यु. पी ) यांच्या प्रयत्नाने व श्री गजपती उपाध्याय व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी प्रतिलिपी करताना ‘चोरू न’ दुसरीही प्रत स्वत:साठी करू न घेतल्याने , धवला ग्रंथाला प्रकाश मिळाला . शेठ लक्ष्मीचंद सिताबराय , भेलसा यांनी त्या धवलाच्या प्रकाशनासाठी द्रव्य उपलब्ध करू न दिल्यामुळे , ह्या ग्रंथाचा पहिला भाग इ. स. १९३५ ला प्रकाशित झाला . अनेक शहरातून त्या ग्रंथाची मिरवणूक काढून आदराने त्यांची मंदिरात स्थापना करण्यात आली .

आचार्य वीरसेनांच्या त्या प्रयत्नांचे खरे सार्थक व्हायला इतकी वर्षे लागली . आज तो धवला ग्रंथ दर्शनासाठी व अभ्यासासाठी प्राप्त झाला आहे . आचार्य श्री वीरसेनाचे महत्कार्य पाहिले , म्हणजे त्यांच्या बुद्धिमत्तेची , सापेक्षतेची व जिनवाणी वरील उत्कट प्रीतीची साक्ष पटते .

## आचार्य कुंदकुंद देव

आचार्य कुंदकुंद हे सर्व जैन आचार्य-कुलाचे सर्वश्रेष्ठ असे कुलपती , ज्यांचे स्मरण होताच श्रद्धेने मस्तक नम्र व्हावे असे थोर परंपरासंरक्षक व्यक्तिमत्व . त्यांना जैनागमातील अनेक रहस्यांचे ज्ञान गुरुपरंपरेने प्राप्त

झाले होते . शब्दरू प व अर्थरू प व अन्वयरू प असे आगमज्ञान त्यांना प्राप्त

झाले होते . आज जी दिगंबर जैन परंपरा आपणास दिसते व त्या परंपरेतून जो आचार-विचार सर्व सामान्यपणे दिसून येतो , त्याचे श्रेय आचार्यांच्याकडे जाते . दिगंबर जैन मुनीसंघात कसल्याही अप-प्रवृत्ती शिरू नयेत , व त्याचे स्वरू प स्वच्छ , निर्मळ राहो यासाठी त्यांनी आपले ८० वर्षांचे मुनीजीवन खर्ची घातले . त्यांचे जीवनाचा स्पष्ट आलेख कुठेही फारसा मिळत नाही . तरी शिलालेख , पुराणे व दंतकथा यातून जो इतिहास उपलब्ध झाला आहे , तोच सध्या प्रमाण मानला पाहिजे .

जीवन परिचय

*पुण्याश्रम कथाकोषात व आराधना कथाकोषात* दोन वेगवेगळ्या कथा आचार्यांच्या संबंधी आलेल्या आहेत . पुण्याश्रव कथा कोषाप्रमाणे आचार्य कुंदकुंद यांचा जन्म दक्षिणेकडील कुरमरई गावातील नगरशेठ श्री करमण्डु यांच्या घरी झाल्याचे सांगितले आहे . आराधना कथाकोषात त्यांचा जन्म एका राजकुलात झाल्याचे कथन असून त्यांचे नाव श्री कौण्डेश असे होते . ते प्रभावशाली राजे असल्याचाही उल्लेख मिळतो . पण या कथाच होत , व त्यातून सत्यांश फारसा प्राप्त होत नाही . परंतु पट्टावली , शिलालेख व उद्धरणे यातून जी माहिती प्राप्त होते , त्यावरू न त्यांचा जन्म आंध्र प्रदेशातील कुंदकुंदपुरम , तालुका गुण्टुर या गावी झाल्याचे निश्चित होते . शिलालेखात कोण्डकुंद . कोणुकुंद अशी नावेही मिळतात .

नंदीसंघाची जी प्रमाणभूत पट्टावली आहे , तीवरू न कुंदकुंदाचा जन्म इ. स. पूर्वकाली , पहिल्या शतकाच्या अंतिम २-३ दशकात झाला असावा . परंतु श्री हार्नले या पाश्चात्य विद्वानाने इ. स. पूर्व १०८ हा काल निश्चित केल्याचे दिसते . तोच काल आता सर्वमान्य झाला आहे . याचा अर्थ असा की आचार्यांचा भ. महावीरांच्या शिष्य परंपरेशी साक्षात संबंध आहे व त्यांना भगवान महावीरांच्या उपदेशाचा लाभ गुरू परंपरेने प्राप्त झाला होता .

नंदीसंघाची जी पट्टावली उपलब्ध आहे व जिचे वैज्ञानिक रीतीने संशोधन झाले आहे , तीवरू न आचार्यांनी बालवयातच गृहत्याग केला होता व कोणत्यातरी श्रेष्ठतम आचार्यांच्या संघात राहून आगमांचे अध्ययन करण्याची महान संधी त्यांना प्राप्त झाली होती .

वयाच्या ११ व्या वर्षी त्यांनी मुनीदीक्षा घेऊन संन्यास प्रव्रज्याचे श्रेष्ठतम जीवन स्वीकारले होते . हा देखील गुरूं चा अनुग्रहच असावा . अशा अत्यंत बुद्धिमान व तैलबुद्धीच्या बालकांचा शोध घेतला जात असे व त्या बालकांना गुरू समीप राहून विद्याध्ययन करण्याची संधी मिळत असे . बालवयातच अनेक आगम सूत्रे बालक श्री कुंदकुंद यांनी मुखोद्गत केली होती . इतकेच नव्हे तर त्यांच्या गुरूं च्या कडून त्या सूत्रांचा अर्थ व विषदार्थ त्यांना प्राप्त झाला होता . तेहतीस वर्षे ते मुनीपदावर राहिले . त्या काळात त्यांनी आंध्र , कर्नाटक प्रदेशात अनेक चातुर्मास केले . त्यात त्यांनी आगमावर अनेक टीका ग्रंथ लिहिले . इ. स. पूर्व ६४ ( चौसष्ट ) या वर्षी त्यांना जैन मुनी संघाचे आचार्यपद प्राप्त झाले . उत्कृष्ट चारित्र्य , घोर तप व ध्यान यामुळे अनेकांची त्यांचीच निवड केली होती . त्या पदावर ते ५१ वर्षे , १० महिने व १५ दिवस राहिले . इतका प्रदीर्घ काळ त्यांना आचार्यपदी राहाता आले . हे जैनधर्माचे भाग्यच होय . इ. स. पूर्व १२ मध्ये त्यांनी समाधीमरणाचा स्वीकार करू न देहत्याग केला .

आचार्य कालातील कार्य

मुनी श्री कुंदकुंद , आचार्य झाल्यावर त्यांनी जैन संघातील अनेक समस्या सोडविल्या . उत्तरेकडे काही शिथिलाचारी आचार्यांनी आपली वेगळी चूल मांडली होती . त्यांनी वस्त्रे , पात्र , लोकरीची चादर , काठी इत्यादी गोष्टींचा स्वीकार केला होता . त्यांनी त्यांच्या समविचारी मुनींची सभा , ज्याला *वाचना* ( Reading ) म्हटले जाते , त्या बोलावल्या . पहिली वाचना पाटलीपुत्र ( पाटना ) , दुसरी मथुरा (उ. प्र. ) व तिसरी वल्लभी ( उज्जैन ) अशा तीन 'वाचना' तून त्यांनी आपली तथाकथित आगमे लिहून काढून , त्यांनाच जैनागम असे नाव दिले . ही वाचना वीर निर्वाण ९८० ला झाली .

परंतु या वाचनेला दिगंबर मुनी संघातील कोणताही प्रतिनिधी उपस्थित नव्हता . उलट अशा प्रकारची वाचना ही परंपरा-संमत नाही , व ज्यांना आगम म्हणून ते म्हणतात , ते दिगंबर जैन मुनीसंघाला मान्य नाही , असा सूर राहिला . येथून मूळच्या जैन संघात फूट पडून श्वेतांबर संघ व दिगंबर संघ अशी दोन शकले झाली .

आ. कुंदकुंदांनी दिगंबर जैन संघाचे नेतृत्व करून त्याला *मूलसंघ* असे नाव ठेवले . ते मुलसंघाचे प्रमुख नेते झाले . जैन मुनीसंघाला एकाच छत्राखाली आणण्याचे व त्या संघाला एकसंघ ठेवण्याचे कार्य , हे ऐतिहासिक स्वरूपाचे आहे . गेली २ हजार वर्षे त्यांचे कार्य व संघपद्धती आजही कायम आहे , त्यांनी संघाला लावलेली कडक शिस्त , त्यांनी सांगितलेली साधुचर्या , आहार-विहाराचे नियम आजही थोड्याशा फरकाने चालू आहेत . वनवासात राहाण्याचे दिवस १० व्या शतकानंतर संपुष्टात आले व मुनी जिनमंदिरात , मुनीगुंफेत राहू लागले . आंध्र , कर्नाटक महाराष्ट्र या भागात मुनीसंघासाठी स्वतंत्र गुंफा इ. स. च्या १, २, -या शतकापासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते . डोंगर कपारीत राहून व ध्यान , स्वाध्याय , अध्ययन , ग्रंथलेखन करणा-या श्रेष्ठतम साधु-संतांनी हा सारा भाग धर्ममय केला , यात शंका नाही .

आचार्यांचे दुसरे कार्य म्हणजे जैन धर्माला राजाश्रय मिळवून देणे हे होते . इ. स. पूर्व पहिल्या शतकातील आंध्र , कोकण , केरळ , कर्नाटक या भागातील राज्यव्यवस्था नष्टप्राय होत चालली होती . पांड्य , चोल यांनी परस्परांशी युद्धे करून स्वतःच्या देशाची आर्थिक हानी करून घेतली होती . शेती व लहान व्यवसाय नष्ट होण्याच्या मार्गावर होते . तेव्हा आचार्य कुंदकुंदांच्या प्रेरणेने देशात सामर्थ्यशाली व लोककल्याणकारी राज्यव्यवस्था निर्माण झाली . नवे राजे व राजवंश उदयाला आले . तर काही ठिकाणी जुन्याच राजवंशाच्या नावाखाली नवी राज्ये उभी राहिली . त्या राजांनी व राज-घराण्यांनी अहिंसा , सत्य , न्यायप्रियता , लोक-कल्याण या जैन राजनीतीप्रमाणे राज्ये चालविली . अहिंसा व अरिहंत ही त्यांची दोन श्रद्धास्थाने होती .

आचार्यांचे तिसरे महत्वाचे कार्य म्हणजे जैन समाजाला ‘समाज’ म्हणून मान्यता . जैन समाज नावाची संकल्पना आचार्यांचीच होय . कारण तोपर्यंत स्वतःला जैन ( जन्माने वा श्रद्धेने ) मानणारा समाज संघटित झाला नव्हता . आचार्यांनी जन्माने ( जैन कुळात जन्मलेला ) श्रद्धेने सर्वज्ञ , वीतरागी अरिहंतला ( जिनाला ) मानणारा परंतु ब्राह्मण , क्षत्रिय , वणिक् या वर्णातून

आलेला , त्या सा-यांसाठी जैनसमाज ही संज्ञा निश्चित केली , समाजाचे असे एकीकरण करण्यात आचार्यांची दूरदृष्टी ध्यानात येते . वर्णव्यवस्थेतून जैन समाज व्यवस्थेचा पाया घालणे आवश्यक होते . पूर्वी चारही वर्णातील स्त्रिया , पुरुष आपआपल्या श्रद्धेने अरिहंतलाचाच खरा देव , निर्ग्रंथ ( दिगंबर ) साधूंना खरा गुरू व आगमांना खरे शास्त्र मानत असत . तोच जैन समाजाचा पायाभूत सिद्धांत ठरला . अरिहंत व अरिहंताची आज्ञा मानणारे , त्यांना पूजणारे , भजणारे सारे एकाच सूत्रात गोवले गेले . त्यानंतरही अनेक लोक जैन समाजात सामावतच गेले . इतकेच नव्हे तर जैन-ब्राह्मण , जैन-क्षत्रिय , जैन-वैश्य असे भेद जैन समाजात एकरू प झाले . हीच स्थिती मुनी संघाची होती . त्या संघातही सर्व वर्णाश्रमाचे लोक समाविष्ट झाले . इतकेच नव्हे तर त्यातील अनेक श्रेष्ठतम आचार्यांनी जैन साहित्याची मनोभावे सेवा केली . संघात जातीवरू न भेदभाव नव्हता .

आचार्यांचे चौथे महत्वाचे कार्य म्हणजे 'जिनवाणीला' एक विशुद्ध स्वरू प देणे , हे होय . मुनी व आर्यिका , श्रावक व श्राविका असा चतुर्विध
( चार भागात गणला जाणारा असा एकच ) संघ होता . त्यातील मुनीजनांना उग्र तपश्चर्येपेक्षाही , कडक वेताचरणापेक्षाही श्रेष्ठतम असा आत्म-प्रधान मार्ग ( ज्याला आजच्या भाषेत अध्यात्म मार्ग म्हणतात ) त्यांनी सांगितला . आगम ग्रंथ विनष्ट , विस्मृत झाले होते . तेव्हा आचार्य श्री कुंदकुंद देवांनी स्वत: समयसार , प्रवचनसार , नियमसार , पंचास्तिकाय अशी ग्रंथसंपदा निर्माण करू न भगवान महावीरांचा मोक्षमार्ग सुस्पष्ट केला . त्या ग्रंथातून त्यांनी मुनीजनांना बाह्य व व्यवहार मार्गापासून परावृत्त होऊन आत्मनिष्ठ , आत्मानुभवी बनण्याचा मार्ग सांगितला . देह जसा आत्म्यापासून भिन्न , वेगळा , तसे सारे आठही कर्म , त्या कर्माची फळे म्हणजे बुद्धी , मन , विचार , विकार , कषाय हे सारे जड-अचेतन असल्याने त्यापासून सर्वथा विभक्त अशा एका चिदानंद स्वरू पी परमात्म-तत्वाला प्राधान्य दिले व व्यवहार नयाला गौण लेखले . याचे कारण जैन समाज दैववादाप्रमाणे कर्मवादाच्या आहारी जाण्याची शक्यता होती . जे घडते , ते सारे कर्मामुळे अशी धारणा होणे शक्य होते . म्हणून कर्मवादाचा आश्रय सोडून ख-या आत्मोन्नतीचा , 'स्वानुभूतीचा' ( आत्मानुभवाचा ) मार्ग त्यांनी स्पष्ट केला . चुकूनही मुनीजनांना पराश्रित विचाराला थारा देऊ नये , अशी त्यांची शिकवण होती .

आचार्य कुंदकुंदांची नावे

आचार्य कुंदकुंदांचे व्यक्तिमत्व इतके वैविध्यपूर्ण , प्रबळ , सामर्थ्यवान होते की त्यांना अनेक नावांनी ओळखले जाऊ लागले . कौण्डकुंद , कुंदकुंद , पद्मनंदी , वक्रगीवाचार्य , एलाचार्य व गृद्धपिच्छाचार्य अशा नावाचे उल्लेख शिलालेखात , पट्टावलीत व ग्रंथांतरी दिसून येतात .

आचार्य कुंदकुंदांचे गुरू कोण ?

आचार्यांनी स्वत: कोणत्याही गुरू चा उल्लेख केला नाही . परंतु नंदिसंघाच्या पट्टावलीत माघनंदी , त्यांचे शिष्य जिनचंद्र , त्यांचे शिष्य श्री कुंदकुंद असल्याचा उल्लेख आहे . परंतु स्पष्ट रू पाने त्याबाबत काही सांगता येत नाही . पूर्वी जिनदीक्षा देणारे गुरू वेगळे असत . म्हणून आता फक्त नंदी-संघाची पट्टावलीच प्रमाण मानली जाते . आचार्यांनी बोध-पाहूड
( गाथा ६१ ) या ग्रंथात श्रुतकेवली भद्रबाहू यांना गुरू मानल्याचे दिसून येते . कोणीही गुरू असला तरी त्यांच्या शिष्याने जे कार्य केले ते अलौकिकच आहे . जैन संस्कृती व परंपरा यांचे श्रेष्ठतम व लोकोत्तर संरक्षक , संवर्धक म्हणून आचार्य कुंदकुंद यांचे स्थान सर्वतोपरी आहे . प्रदीर्घ आयुर्मान लाभलेले व पवित्र जिनवाणी मातेची आयुष्यभर उत्तुंग साधना करणारे आचार्यश्री सर्वांनाच वंदनीय ठरले आहेत .

विदेह क्षेत्राची भेट

अशी एक लोककथा आहे की विदेह नावाचे जे क्षेत्र आहे तेथे आजही विद्यमान असे वीस तीर्थंकर विहार करीत आहेत . ते केवली , सर्वज्ञ व वीतरागी आहेत . त्यांचे दर्शन घेण्यासाठी आचार्य श्री कुदकुंद गेले होते . तेथे सहा महीने राहून त्यांनी भरतक्षेत्रातील मुनी परंपरा व श्रावक परंपरा यांचेबाबत तेथील श्रुतकेवलींना माहिती दिली व मनातील अनेक शंकांचे , जातीने श्री श्रीमंधर भगवंताच्या कडून समाधान करू न घेऊन धन्य झाले . भगवान महावीरांच्या नंतर साक्षात अरिहंत श्री सीमंधर भगवंतांचे दर्शन घेणारे ते पहिलेच आचार्य होत . त्यांनी आत्मानुभूतीचा जो विचार त्याकाळी समयसार , प्रवचनसार , नियमसार आदि ग्रंथातून सांगितला

आहे , तो प्रमाणभूत मानला गेला आहे . म्हणून आचार्य श्री कुंदकुंद यांचे जीवन व त्यांचे लोकोत्तर कार्य सर्वांना ज्ञात असले पाहिजे . त्यांनी आगमाची जी सेवा केली ती सर्वतोपरी श्रेष्ठतम आहे . त्याचे परमशिष्य श्री उमास्वामी यांनी श्री तत्वार्थसूत्र नावाचा अद्वितीय ग्रंथ लिहिला आहे . आज जे तत्वज्ञान उपलब्ध आहे , ते सारे श्री तत्वार्थसूत्रावरच आधारित आहे . असे शिष्य ज्यांना लाभले ते आचार्यही सदैव वंदनीय , पूजनीय व श्रद्धेय आहेत .

## आचार्य उमास्वामी

आचार्य उमास्वामींचे कार्यदेखील फार मोठे आहे . जैन सिद्धांतांना त्यांनी सूत्ररू पात बद्ध करू न तत्वार्थसूत्र या महान ग्रंथाची रचना केली . आचार्य उमास्वामी हे आचार्य कुंदकुंदांचे पट्टशिष्य होते , ते विक्रम संवत तिस-या शतकात होऊन गेले . श्रवणबेळगाव येथील १०८ नंबरच्या शिलालेखावरू न असे आढळते की ते आचार्य कुंदकुंदांचे पट्टशिष्य असून सर्व पदार्थांचे ज्ञाते होते .

आपल्याकडे कोणत्याही आचार्यांनी स्वत:संबंधीचा उल्लेख आपल्या ग्रंथात केलेला नाही . त्यांच्या तत्वार्थसूत्र ग्रंथाबद्दल जैन समाजाला जेवढी माहिती आहे , तेवढी त्यांच्या वैयक्तिक जीवनाविषयी नाही . त्यांच्या जीवनाची माहिती मिळविण्यासाठी विद्वानांनी बरेच प्रयत्न केले , पण माहिती मिळू शकली नाही .

श्वेतांबरांच्या तत्वार्थधिगमसूत्रात थोडासा परिचय मिळतो . आचार्यांनी प्रशस्तिमध्ये स्वत:संबंधी केलेला उल्लेख एका श्लोकावरू न आढळतो .

न्यूग्रोधिकाप्रसूतेन विहरता पुरवरे कुसुमनाम्नि
कौभिषणिना स्वातितनयेन वात्सीसुतेनार्ध्यम्

यावरू न असे आढळते की त्यांचा जन्म न्यग्रोधि नावाच्या नगरीत झाला असून वडिलांचे नाव स्वाती आणि आईचे नाव वात्सी असे होते . त्यांचे गोत्र कौभिषिणी हे होते .

त्यांच्याविषयी आणखी एक आख्यायिका सापडते . सौराष्ट्र देशात , गिरीनगरात विद्वान सिद्धय्या नावाचा ब्राह्मण रहात होता . तो शास्त्रांचा ज्ञाता असून स्वत:चे हितही पहाणारा होता . त्याने एका

भिंतीवर 'दर्शनज्ञानचरित्राणी मोक्षमार्ग:' असे सूत्र लिहिले होते . त्याचवेळी श्री उमास्वामी आहारासाठी आले . तेव्हा त्यांची नजर त्या सूत्रावर गेली . त्यांनी त्या सूत्राआधी 'सम्यक्' शब्द लिहिला व ते निघून गेले . सिद्धय्याने ते पाहिले . तेव्हा तो अतिशय आनंदित झाला . त्याने 'सम्यक्' शब्द कोणी लिहिला याची मातेकडे चौकशी केली . तेव्हा तिने निर्ग्रंथाचार्यांनी हा शब्द लिहिला , असे सांगितले . तेव्हा त्यांचा शोध घेत घेत ते आ. उमास्वामीकडे गेले . आणि नतमस्तक होऊन त्यांना आत्म्याच्या हितासंबंधी पृच्छा केली . त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून आचार्यांनी 'तत्वार्थसूत्र' हा ग्रंथ लिहिला .

एकदा ते विहार करीत असताना त्यांची पिच्छी हरवली . तेव्हा मोराची पिसे न मिळाल्यामुळे त्यांनी गिधाडाच्या पिसापासून पिच्छी तयार केली , म्हणून त्यांना गृद्धपिच्छ असे म्हणतात . उमास्वामी हे उच्च नागर शाखेचे होते . डॉ. हर्मन जॅकोबीच्या सांगण्यावरू न शिवश्री , घोषनंदी व उमास्वामी अशी ही विद्यागुरूं ची परंपरा आहे .

आचार्य उमास्वामी हे आचार्य कुंदकुंदांच्या परंपरेतील प्रमुख असून त्यांची स्मरणशक्ती अतिशय तीव्र होती . त्यामुळे समग्र जिनशासनाला सूत्रात्मक रीतीने बद्ध करण्याची किमया त्यांनी साधली होती . इतकी प्रज्ञावान व अतर्क्य बुद्धिमत्ता असलेली व्यक्ती सहसा आढळत नाही . द्वादशांग वाणीला सूत्रात बद्ध करणे हे साधे काम नाही . कुंदकुंदाचार्यांनी 'समयसार' लिहून लोकांना उपकृत केले तर त्यांच्या पट्टशिष्याने 'तत्वार्थसूत्र' हा ग्रंथ लिहून जैनसमाजावर फार मोठे उपकार केलेत . अशा परमवंदनीय गुरू शिष्यांनी जिनशासनाचा हा प्रभावी रथ जिनधर्माच्या प्रभावनेसाठी व भव्य जीवांना प्रतिबोधन करण्यासाठी संचारित केला .

तत्वार्थसूत्रावर अनेक आचार्यांनी टीका लिहिल्या . आचार्य पूज्यपादस्वामींनी 'सर्वार्थसिद्धी' या नावाची टीका लिहिली . भट्ट अकलंकाचार्यांनी 'तत्वार्थवार्तिक' नावाची टीका लिहिली . आचार्य विद्यानंद यांनी 'तत्वार्थश्लोकवार्तिक' ही टीका लिहिली .

'तत्वार्त्थसूत्र' या ग्रंथात विविध विषयांचा समावेश आहे . पहिल्या अध्यायात एकूण ३३ सूत्र असून त्यात सम्यक्दर्शन , सम्यक्ज्ञान आणि सम्यक्चारित्र्य हेच मोक्षमार्गाला नेणारे आहेत , याचे विवेचन आहे . दुस-या अध्यायात जीवाचे विविध गतीतील जन्म , योनी व त्यांचे धारकजीव यांचा उल्लेख आहे . तर

पाच प्रकारच्या शरीराचे वर्णन असून कार्माण शरीर कसे महत्वाचे आहे हे सांगितले आहे . यात एकूण ५३ सूत्रे आहेत .

तिस-या अध्यायात नारकी जीवाचे वर्णन , तेथील दु:खे यांचे वर्णन असून भौगोलिक माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे . यात ३९ सूत्र आहे . चौथ्या अध्यायात देवसृष्टीचे वर्णन आहे . दिव्य धामांचे व समृद्धीचे वर्णन आहे . यात एकूण ४२ सूत्रे आहेत . पाचव्या अध्यायात द्रव्यचर्चा केली आहे . जीव-अजीव , पुद्गल , आकाश , धर्म-अधर्म आणि काल यांची माहिती आहे . तसेच अणु-स्कंध यांचेही वर्णन आहे . एकूण सूत्रे ४२ आहेत .

सहाव्या ते दहाव्या अध्यायात एकूण १२ गोष्टींचे वर्णन आहे . आस्त्रवाचे स्वरू प व त्याचे भेद , त्याच्याशी बद्ध असलेली कर्मे , वेतांचे स्वरू प , त्याचे भेद , वेतात संभवणारे दोष , दानाचे स्वरू प , त्याचे हेतू , संवर व त्याचे भेदोपभेद , निर्जरा या सर्व गिष्टीचे यात विवेचन आहे . वाईट प्रवृत्तीचे सेवन करणा-याला काय फळ मिळते , त्याचा नाश कसा करावा , हे सांगून शेवटी मोक्षांच्या स्वरू पाचे वर्णन केले आहे .

तत्वार्थ ग्रंथातील काही सूत्रे म्हणजे अमूल्य रत्नेच होत . इतक्या थोड्या सूत्रात संपूर्ण आगमाचे सार सांगणारा हा ग्रंथ म्हणजे खरोखर गागरमें सागर होय . जैन तत्वज्ञानाची सूत्रात्मक रचना करणारे उमास्वामी हे पहिलेच आचार्य होत . अशा प्रकारची सूत्रात्मक रचना करण्यासाठी भाषेवर असामान्य प्रभुत्व पाहिजे . जैनागमातील भूगोल , खगोल , तत्वज्ञान , तर्कशास्त्र या सर्व गोष्टींचा यात समावेश आहे . तसेच जैनेतरांच्या मतांचे खंडन करण्यासाठी त्यांनी न्याय , वैशेषिक सांख्य , योग आणि बौद्ध दर्शनाचाही सखोल अभ्यास केला आहे , असे आढळून येते . पाणिनीच्या व्याकरणाचा अभ्यासदेखील त्यांच्या तत्वार्थसूत्रातून प्रकट होतो . जैन परंपरा ही श्रद्धा प्रधान आहे . संशोधन , परिवर्धन , तर्कवाद याबाबतही जैन परंपरा बुद्धीला खाद्य पुरविते .

आ. उमास्वामींची ही रचना तत्व प्रधान आहे . भाषेवरील प्रगाढ प्रभुत्व , पांडित्य आणि ज्ञानाची तळमळ असलेल्यांना मार्गदर्शन करण्याची तीव्र इच्छा , त्यासाठी लागणारी प्रतिभा त्यांच्या अंगी असल्याचे आढळून येते . या ग्रंथाच्या रू पाने आचार्यांनी जैन समाजाला अमूल्य निधी अर्पण केला आहे .

# <u>धर्मप्रभावक आचार्य श्री समंतभद्र</u>

पूर्वे पाटलिपुत्र-मध्य नगरे भेरी मया ताडिता
पश्चात् मालव सिंधुठक्क विषये कांचीपुरे वैदिशे
प्राप्तोऽहं करहाटकंबहुभटं विद्योत्कटं संकटं
वादार्थी विचराम्यहं नरपते शार्दुलविक्रीडितम्

दक्षिणेतील आचार्यपरंपरेमध्ये एक महान धर्मप्रभावक या नात्याने पूज्य श्रीसमंतभदेआचार्यांचे स्थान श्रेष्ठ आहे . वरील श्लोकात त्यांनी स्वत: घोषित केल्याप्रमाणे , भारताच्या चारही भागातील प्रमुख राजांच्या दरबारी त्यांनी अनेकांत शर्माची प्रभावना केली . या महाविद्वान आचार्यांच्या वाक्पटुत्वाकडे मोठमोठ्या वादी-पंडितांनी शरणागती पत्करली; आणि त्यांच्या लेखणीही समर्थ होती . त्यांची अमिल ग्रंथरचना केवळ दिगंबर जैनाच्या इतिहासातच नव्हे , तर संपूर्ण संस्कृत साहित्य परंपरेमध्ये एक महान् युग निर्माण करणारी ठरली . अशा श्रेष्ठ आचार्यरत्नाची ही स्फूर्तिदायी कथा आहे .

आचार्य समंतभद्र इ. सनाच्या तिस-या शतकात होऊन गेले . काही विद्वानांच्या मते ते राजकुलोत्पन्न होते . पूर्व वयातच त्यांनी भगवती दीक्षा घेतली . दीक्षा ग्रहणानंतर 'समंतभद्र' या नावाने ओळखले जाऊ लागले .

काही दिवसांनी पूर्व अशुभ कर्माच्या उदयाने त्यांना भस्मक रोग झाला . या रोगामुळे कितीही अन्न खाल्ले तरी त्यांची भूक शमेना . क्षुधेच्या या सतत पीडेमुळे मुनीच्या नित्य क्रियापालनात त्यांचे लक्ष लागेना . अशा परिस्थितीत देहत्याग करणे योग्य , असे ठरवून ते आपल्या गुरू कडे गेले . पण गुरूं नी परवानगी दिली नाही . ते समंतभद्रांची योग्यता जाणून होते . त्यांच्या हातून पुढे जिनधर्माची फार मोठी प्रभावना होणार आहे , हे भविष्य त्यांना ज्ञात होते . म्हणून त्यांनी समंतभद्राला अशी आज्ञा दिली की भस्मक रोग शांत होई तो त्यांनी मुनिपदाचा त्याग करावा . रोग बरा झाल्यावर फिरू न दीक्षित व्हावे .

गुरुआज्ञेप्रमाणे समंतभद्रांनी मुनीपदाचा त्याग केला . मग बौद्धभिक्षूचा वेश घेऊन ते फिरत फिरत पौंड्रपूर नगरीत गेले . काहीकाल त्यांनी तेथे काढला . पण क्षुधा शमेल इतके भोजन मिळेना . तेव्हा ते दशपूर नगरीला गेले . तिथे त्यांनी भागवतपंथी साधूचा वेष करू न काही दिवस सदावर्तात भोजन केले; पण तृप्ती होईना . शेवटी निराश होऊन फिरत फिरत ते वाराणसीला गेले .

वाराणसीचा राजा शिवकोटी हा महान शिवभक्त होता . त्याने आपल्या राज्यात अनेक शिवमंदीरे बांधली होती . शिवमूर्तीला त्याच्यातर्फे रोज पंचपक्वान्नांचा नैवेद्य अर्पण केला जाई . ते पाहून समंतभद्रांना वाटले , हा पुष्टीकारक नैवेद्य जर मिळेल तर या रोगामुळे उत्पन्न झालेली क्षुधेची पीडा खात्रीने मिटेल . मग शैव साधूचा वेष घेऊन ते शिवकोटीच्या राजसभेत गेले . भस्मचर्चित अशी समंतभद्राची विद्वत्तादर्शक मुद्रा आणि शुद्ध चारित्र्यामुळे , ब्रह्मचर्यामुळे तळपणारी त्यांची अंगकांती पाहून हा कोणी महान शिवभक्त साधू आहे , अशी शिवकोटी राजाची निश्चित धारणा झाली . त्याने मोठ्या नम्रतेने त्या 'शैव' साधूस नमस्कार केला . त्याला आशीर्वाद देऊन समंतभद्र म्हणाले , "हे राजा , तू थोर शिवभक्त आहेस . तू शिवाची पूजा रोज यथासांग करतोस . पण एवढ्या भक्तीने तू समर्पिताला अतिउत्कृष्ट अशा पक्वान्नांचा नैवेद्य साक्षात शिवाला खायला लावील , असा कोणी भक्त तुझ्या राज्यात नाही का ? "

यावर राजाने खेदाने नकारार्थी मान हलवली . तेव्हा ते मनःपूर्वक म्हणाले , "काही चिंता करू नकोस , मी तुझा नैवेद्य देवाला स्वीकारायला लावतो."

साधूच्या या आश्वासनाने शिवकोटी राजाला पराकाष्ठेचा आनंद झाला . आपली कित्येक दिवसांची एकनिष्ठ भक्ती आज फळाला आली , असेच त्याच्या भाविक मनाला वाटले . त्याने दुस-या दिवशी नाना प्रकारच्या मिष्टान्नांची ताटे भरभरू न शिवमूर्तीला नैवेद्य अर्पण केला आणि तो शिवाला स्वीकारायला लावावा , अशी समंतभद्रांना विनंती केली . आपण तो नैवेद्य देवाला एकांतात खायला घालू शकू , असे सांगून त्यांनी सर्वांना मंदिराच्या बाहेर काढले; अन् ती सारी पक्वान्ने स्वतः स्वाहा केली . पण राजासह सर्व लोकांची मात्र अशी समजूत
झाली , की तो नैवेद्य महादेवानेच स्वीकारला . कारण कोणत्याही एका माणसाला इतके अन्न खाववणार नाही , हे निश्चित .

काही दिवसांनी समंतभद्राचा भस्मकरोग त्या पुष्टीकारक व विपुल अशा नैवेद्याने शांत होऊ लागला . अन्न शिल्लक राहू लागले . तेव्हा लोक त्यांना त्याबाबत विचारू लागले . त्यावर खुलासा करीत की "तुम्हा भक्तासाठी देवाने तो प्रसाद राखला आहे." पण पुढे पुढे लोकांचे या खुलाशाने समाधान होईना . कारण प्रसाद अधिकाधिक राहू लागला . तेव्हा एके दिवशी काय खरे आहे ते शोधून काढण्यासाठी

एकजण गुपचूप मंदिरात लपून बसला . अन् त्याने समंतभद्राचे सारे कारस्थान जाणून घेऊन राजाच्या कानावर घातले .

हे ऐकून राजाला भयंकर राग आला , 'आपल्या भक्तिभावनेची ही विटंबना ! अन् प्रत्यक्ष राजाची अशी प्रतारणा !' त्याने तत्काळ समंतभद्रांना बोलावून आणले , आणि त्यांना शिवमूर्तीसमोर उभे करू न असे कपट-कारस्थान करण्याचे कारण विचारले . आपली सर्व खरी हकीकत राजाला सांगून समंतभद्र शेवटी म्हणाले , "हे राजा , आता माझा रोग शांत झाला आहे . गुरू जवळ प्रायश्चित घेऊन मी पुन्हा दीक्षित होईन . तू मला आता रजा दे ."

"नाही !" राजा जोराने मान हलवून म्हणाला , "माझ्या भक्तिभावनेची तू भयंकर चेष्टा केलीस . माझ्या आराध्य दैवताचीही तुला काहीच किंमत वाटली नाही . माझा भक्तिपूर्ण नैवेद्य तू आपला रोग शमविण्यासाठी पोटात रिचविलास . याचं प्रायश्चित तू घेतलं पाहिजेस . प्रथम तू महादेवाला नमस्कार कर . आपल्या अपराधाबद्दल , त्याची करू णा भाक."

"अवश्य !" समंतभद्र म्हणाले , "पण राजन् . माझा नमस्कार या देवाला मानवणार नाही ."

अर्थात् राजाचा त्यांच्या शब्दावर मुळीच विश्वास बसला नाही . तेव्हा समंतभद्रांनी एका दिवसाची मुदत मागून घेतली . राजाने परत त्यांना त्याच मंदिरात कोंडून ठेवले .

समंतभद्रानी ती सारी रात्र चोवीस तीर्थंकरांचे अनन्य भावाने स्तवन करण्यात घालविली . आपली आतापर्यंतची धर्मसाधना जर निर्मळ असेल तर उद्याच्या दिव्यातून आपण अवश्य निभावून जाऊ , असा त्यांना विश्वास वाटत होता . हळूहळू रात्र संपली . सूर्योदयाबरोबर मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले . राजा आत आला . त्याच्या मागे नगरवासी जनांचीही खूप गर्दी होती . समंतभद्रांची होणारी फजिती पाहण्यासाठी ते सर्वजण उत्सुक झाले होते . पण समंतभद्रांची वृत्ती धीरगंभीर होती . त्यांच्या मुद्रेवर भयाचे किंवा चिंतेचे बिलकुल चिन्ह दिसत नव्हते . रात्रभर केलेल्या भगवद् आराधनेने त्यांचे चित्त पुष्कळ स्थिर झाले होते . ते शांतपणे शिवमूर्तीसमोर बसले , अन् त्यांनी रात्रीतून रचलेल्या स्वयंभू-स्तोत्राचा पाठ म्हणावयाला सुरू वात केली . जिनेश्वराच्या अनंत चतुष्टयात्मक गुणांचे संकीर्तन सुरू करताच , त्यांचे शुद्ध हृदय स्वाभाविकपणेच भक्तीने दाटून आले . त्यांच्या भावपूर्ण कंठातून निघणा-या जिनस्तुतिपर शब्दांनी मंदिराचे ते विशाल प्राकार हळूहळू भारू न गेले . एक अतिपवित्र वातावरण तेथे

निर्माण झाले . समंतभद्रही आपल्या स्तुतीविषयाशी समरस झाले होते . एकेका तीर्थकराचे गुणगान करीत ते चंद्रप्रभूंच्या वर्णनापर्यंत येऊन पोहोचले , तेव्हा भोवतालच्या परिस्थिचा पूर्णपणे विसर पडून ते अगदी तन्मयतेने गाऊ लागले होते.

चंद्रप्रभं चंद्रमरीचिगौरं
चंद्रंद्वितीयं जगद् - एव कांतम्
वंदेभिवद्यं महतामुनीद्रं
जिनं जितस्वांतकषायबंधम्

याच वेळी घनगंभीर आवाज होऊन गाभा-यात दैवी तेजात चंद्रप्रभ तीर्थंकराची मूर्ती प्रकट झाली . हा अघटित प्रकार पाहून सर्वजण अगदी थक्क झाले . राजा तर केवळ अवाक् बनला . पण संतभद्रांच्या भक्तीचे सामर्थ्य किती थोर आहे , याचा त्याच्या भक्तहृदयाबद्दल प्रत्यय येताच , त्याचा सर्व अहंकार गळून गेला . त्यांच्या असामान्य योग्यतेबद्दल त्याची पूर्ण खात्री पटली . तो हात जोडून आणि मस्तक नम्र करू न पुढे आला , आणि विनंतीपूर्वक आचार्यंना म्हणाला , "मुनीवर्य ! मी आतापर्यंत भ्रमातच होतो , असे म्हटले पाहिजे . धर्माचे वास्तविक स्वरू प काय आहे , ते मला कृपा करू न समजून सांगा."

सत्यधर्माचे स्वरू प जाणून घेण्यास राजा खरोखरच उत्सुक आहे असे पाहून समंतभद्रांनी त्याला जिनप्रणीत धर्ममार्गाचा उपदेश केला . त्या उपदेशाने शिवकोटीच्या मूळच्या श्रद्धाशील मनाला योग्य दिशा मिळाली . त्याच्या भक्तीला उचित आधार सापडला . मग त्याने सर्वसंग त्याग करू न समंतभद्राचार्याजवळ भगवती दीक्षा ग्रहण केली . वाराणशीतील कित्येक विवेकी नागरिकांनी जिनधर्म स्वीकारला .

समंतभद्रांनी पुढे सर्व भारतभर विहार केला . पाटलीपुत्र , मालव , ठक्क ( पंजाब ) , कांची , विदिशा आदि प्रसिद्ध राज्यांच्या राजधान्यांना त्यांनी भेटी दिल्या . तेथील राजसभेत अन्यधर्मीय विद्वानांचा शास्त्रार्थामध्ये पराजय करू न त्यांनी स्याद्वाद मताची महती वाढविली . अखेर ते दक्षिणेत क-हाटक प्रांतात आले . तेथील राज्याच्या दरबारात प्रारंभी दिलेला श्लोक म्हणून त्यांनी पंडितांना वादाचे आव्हान

दिले . आणि अखेर आपल्या वाक्चातुर्याने त्यांचा पराभव केला . त्यांच्या या अजोड विजयाबद्दल श्रवणबेळगोळ येथील शिलालेखात पुढील गौरवपूर्ण उद्‌गार काढण्यात आले आहेत .

'आचार्य समंतभद्रांच्या मुखातून निघणारी समर्पक वचने मदोन्मत्त वादींना अंकुशप्रमाणे ताळ्यावर आणीत . त्यांच्या वादविवाद कौशल्यामुळे खोटा वाद घालण्याची कीडच जगातून नाहीशी झाली.'

समंतभद्रांनी आपल्या 'देवागम' स्तोत्रात श्री सर्वज्ञ देवाच्या गुणाचे विवेचन मार्मिकपणे केले आहे . त्यावर नंतरच्या कित्येक आचार्यांनी टीका लिहिल्या . त्यांचा आणखी एक प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे 'रत्नकरंडक श्रावकाचार.' त्यात श्रावकाच्या आचारांची माहिती सविस्तरपणे दिली आहे . त्यांच्या 'स्वयंभू स्तोत्र' , 'जिनशतक' या स्तुतिकाव्यावरून त्यांच्या गाढ भक्तिप्रवण साक्ष पटते . 'युक्त्यनुशासन' या नावाचा न्यायशास्त्रावर एक ग्रंथ त्यांनी लिहिला . त्यांचा 'गंधहस्ति महाभाष्य' हा ग्रंथ मात्र उपलब्ध नाही . त्यांच्या या ग्रंथनिर्मितीमुळे जैन परंपरेवर फार मोठे उपकार झालेले आहेत .

## आचार्य श्री पूज्यपाद देवनंदी

कवीनां तीर्थकृत् देव: किंतरां तत्र वर्ण्यते ।
विदुषां वाड्‌मलध्वंसि , तीर्थ यस्य वचोमयम् ।

( आचार्य जिनसेन )

पूज्य श्री देवनंदी पूज्यपाद आचार्यांची थोरवी महापुराणकार आचार्य श्री जिनसेनांनी वरील श्लोकात गायली आहे .

कोण आहेत , ते पूज्यपाद आचार्य ? असा प्रश्न तुमच्या मनात येईल . जैन साहित्य शारदेची पूजा बांधणारे श्रीपूज्यपाद हे अलौकिक व असाधारण असे आचार्य होऊन गेले . त्यांचे सुंदर चरित्र

कानडीमध्ये कवीश्रेष्ठ श्री चन्द्रय्या यांनी लिहिले आहे . तसेच राजावली कथा या पुस्तकातही त्यांच्या जीवनाची माहिती मिऴते .

जन्म - परिचय

कर्नाटक प्रदेशातील *कोले* या छोट्याशा खेड्यात *श्री माधव भट्ट* नावाचे एक जैन ब्राह्मण श्रावक राहात होते . ते स्वत: अनेक ग्रंथांचे जाणकार व अभ्यासू होते . साहित्य , काव्य , व्याकरण व वैद्यक इ. ज्ञानशाखांत त्यांची प्रगती होती . त्यांची पत्नी *श्रीदेवी* ही अत्यंत कुशाग्र , तल्लख , बुद्धीची होती . तीही अनेक शास्त्रात पारंगत होती . त्यांचे सुपुत्र म्हणून पूज्यपाद श्री देवनंदींचा जन्म झाला . त्यांची जन्म कुंडली पाहून त्यावेळच्या ज्योतिष्यांनी त्या बालकाला त्रिलोक-पूज्य व्यक्तिमत्वाचे हे बालक असल्याचे भविष्य कथन केले होते . त्यांना एक बहिणही होती . तिचे नाव कमलिनी असे होते . सरस्वती देवीची उपासना निष्ठेने करणारे ते कुंटुंब होते . कमलिनीचा विवाह श्री गुणभट्ट या तेजस्वी , मेधावी व अत्यंत श्रेष्ठ गुण , रू प संपन्न युवकाशी झाला होता .

पूज्यपाद देवनंदी हे १२-१४ वर्षाचे असताना त्यांनी एकदा बगिच्यात एका सापाला पाहिले . त्याने तोंडात बेडकाला धरले होते . तो प्रसंग , ते दृश्य पाहून त्यांना वैराग्य झाले . जणु काळ ( मृत्यू ) रू पी सापाने संसारातील प्रत्येकाला असेच तोंडात धरले आहे , असा विचार त्यांच्या मनात आला . त्या विचाराने ते संसारातून विरक्त झाले . युवा अवस्थेतच त्यांनी ब्रह्मचर्यव्रताचा स्वीकार केला व आपले सर्व जीवन धर्म व साहित्य यांच्या सेवेत घालविले . त्यांच्या कुंटुंबाशी संबंधित असलेले महान व्याकरणकार पाणिनी हे होते . त्यांचा भाचा श्री नागार्जुन हा मोठा रसविद्याकार होऊन गेला . त्याला या विद्येचा मंत्र श्रीपूज्यपाद यांनी दिला होता . कथेत सांगितलेली विशिष्ट रसायनांचे लेप पायाला लावून पूज्यपाद हे आकाशातून भ्रमण करीत होते . ते उत्कृष्ट वैद्य होते . वनस्पतींचा अभ्यास त्यांनी अत्यंत सूक्ष्मतेने केला होता .

आचार्यांच्या बुद्धीचे तेज सूर्याप्रमाणे होते . त्यांची बुद्धी अनेक विषयात रमत होती . ज्ञानाला मर्यादा नसते . ज्ञान - कमल प्रफुल्लित झाले की मग सारे विश्वच जणू त्यांच्या सेवेत उपस्थित होते . तसे आचार्यांचेही होते .

त्यांचे साहित्य .

१) सर्वार्थसिद्ध - श्री उमास्वामीजींच्या ( इ. स. २ रे शतक ) तत्वार्थसूत्रावर त्यांनी अत्यंत सुंदर संस्कृत भाषेत टीका ग्रंथ लिहिला आहे . त्या ग्रंथाचे नाव आहे , सर्वार्थसिद्धी . जैन आचार्यात काही मतभेद किंवा वैचारिक मतमतांतरे असतील तर त्या सर्वांची उत्तरे देणारा व सर्व प्रकारच्या अर्थांची प्राप्ती करू न देणारा हा ग्रंथ आहे .

२) समाधी तंत्र - अध्यात्म व परमात्म प्राप्तीसाठी हा ग्रंथ आहे . केवळ १०५ गाथामधून त्यांनी आत्मोपासना कशी करावी , ध्यान / चिंतन कसे करावे , याचे सुंदर विवेचन केले आहे . भगवान कुंदकुंद महाप्रभूंच्या समयसार या ग्रंथाचा सारच जणू यातून दिला गेला आहे .

३) इष्टोपदेश - केवळ ५१ श्लोकांचा हा ग्रंथ आहे . आत्म्याला परमात्मा बनविण्यास काय करावे , याचा सुंदर उपदेश यात केला आहे .

४) दशभक्ती - यात अत्यंत उपयुक्त अशा दहा प्रकारच्या भक्तींची रचना आहे . सिद्ध भक्ती , श्रुत भक्ती , चरित्र-भक्ती , योगी-भक्ती , आचार्य भक्ती , निर्वाण भक्ती , नंदीश्वर भक्ती , इ. यातील काही भक्ती प्राचीन परंपरेतील आहेत . काही आचार्य देव कुंदकुंदांनी रचलेल्या भक्तींचाही यात समावेश आहे .

५) जैनेंद्र व्याकरण - आचार्य श्री पूज्यपाद यांनी संस्कृत व्याकरणावर लिहिलेला व पाणिनीच्या व्याकरणावरही मात करणारा असा हा ग्रंथ आहे . त्यातील पहिलेच सूत्र मोठे सूचक आहे . 'सिद्धिरनेकांतात्' हे ते सूत्र होय . सर्व ज्ञान प्राप्तीत हे सूत्र मोठे उपयोगी आहे . एकाच प्रकारच्या गोष्टीने जीवन समृद्ध होत नाही . आजच्या विज्ञानाने देखील हे सूत्र उपयोगाचे मानले आहे . याग्रंथात पाच अध्याय असून ३ हजारावर त्यात सूत्रे आहेत .

याशिवाय त्यांनी शान्त्यष्टक , सार-संग्रह ,चिकित्सा शास्त्र , जैनाभिषेक , अर्हत् प्रतिष्ठ लक्षण , ज्योतिष शास्त्र इ. ग्रंथ लिहिल्याचेही उल्लेख मिळतात .

त्यांचा जन्म अंदाजे इ. स. च्या ६ व्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजे इ. स. ५२५-३० च्या सुमारास झाला असावा . त्यांचे आयुष्य हे ९०-९५ वर्षांचे असावे . या प्रदीर्घ काळात त्यांनी

साहित्याच्या अनेक क्षेत्रात उत्कृष्ट ग्रंथांची रचना केली व आयुष्याच्या अंतिम समयी समाधीपूर्वक देहत्याग केला .

अशा थोर आचार्यांचा परिचय प्रत्येकाला असायलाच हवा . त्यांचा त्याग , त्यांची तपश्चर्या , त्यांनी जीवनभर मांडलेला ज्ञान-यज्ञ व अनेक श्रेष्ठ मुनी जनांना या धर्मप्रभावक कार्यात उद्युक्त करण्याचे कार्य पाहून मन आश्चर्याने व आनंदाने पुलकित होते .

# आचार्य सिद्धसेन दिवाकर

कवय: सिद्धसेनाद्या वयं च कवयो: मता:[१]

मणय: पद्मरागाद्या ननु काचोऽपि मेचक:[१]

आचार्य सिद्धसेनांची स्तुती प्रत्येक आचार्यांनी केली आहे . *हरिवंशपुराणात* आचार्य जिनसेनांनी , तर आचार्य कल्याणकीर्तीनी यशोधरचरित्रात , श्रीहरिभद्रसूरींनी पंचवस्तुकमध्ये , तर श्री हेमचंद्राचार्यांनी अयोगव्यवच्छेदिकेत त्यांची स्तुती केली आहे . दिगंबर व श्वेतांबर दोन्ही संप्रदायात त्यांना मान्यता आहे . श्वेतांबरांनी त्यांना दिवाकर हे विशेषण लावलेले आहे .

आचार्य सिद्धसेन दिवाकर हे अत्यंत प्रभावशाली आचार्य होते . ते एक महान तार्किक होते . पं. जुगलकिशोर मुख्तार यांनी आपल्या "सन्मतिसूत्र और सिद्ध सेन" या लेखात त्यांच्याविषयी बरीच माहिती दिली आहे. त्यानुसार '*सन्मतिसूत्र*' या ग्रंथाचे लेखक आचार्य सिद्धसेन दिवाकर हेच आहेत असे सांगितले आहे . 'सन्मतिसूत्र' याच ग्रंथाला श्वेतांबर लोक 'सन्मतितर्क' असे म्हणतात . पण हे सिद्धसेन कोण ? त्यांचे गुरू कोण ? ते कोणत्या काळात होऊन गेले , यासंबंधी मात्र निश्चित माहिती मिळत नाही . जैन आचार्यपरंपरेत अनेक सिद्धसेनाचार्य होऊन गेल्यामुळे मोठाच गोंधळ उडाला आहे .

त्यांच्या कालाच्या बाबतीतही अनेक प्रवाद आहेत . पंडित जुगलकिशोर मुख्तार यांनी अंतरपरीक्षणाच्या सहाय्याने त्यांचा काळ ठरविण्याचा प्रयत्न केला आहे . त्यासाठी आचार्य सिद्धसेनाच्या साहित्याच्या पाहणीद्वारे बाह्यप्रभाव , उल्लेखविशेष , ग्रंथातील विविध वाक्ये व त्याच ग्रंथात उल्लेखित विषयाचा अन्यत्र दिसणारा पडसाद , टीका , पैरमतखंडनपद्धती अथवा स्वमतमंडनपद्धती याशिवाय इतर ग्रंथकारांचे सिद्धसेनाचार्याविषयीचे त्यांच्या ग्रंथातून काढलेले उद्‌गार इ. बाबींच्या साहाय्याने काल-निर्णय करण्याचा प्रयत्न केला आहे .

पं. सुखलालजींना आचार्य सिद्धसेनांचा काल विक्रम संवत ५ वे शतक मानला आहे . त्यासाठी त्यांनी पूज्यपादाचार्य व निर्युक्तीकार भद्रबाहू यांच्या कालाचा आधार घेतला आहे . पण हा काल पं. जुगलकिशोरजींना मान्य नाही . पं. जुगलकिशोरजींनी सिद्धसेनाचार्याचा काळ ६ व्या किंवा ७ व्या शतकाचा उत्तरार्ध मानला आहे व त्याला सबळ पुरावे दिले आहेत . 'जैनसिद्धांत कोश' या

ज्ञानपीठाने प्रकाशित केलेल्या ग्रंथात त्याचा काळ इ. स. ५५० मानला आहे व ते श्वेतांबराचार्य असून ते 'सन्मतीतर्क' कर्ते आहेत असे म्हटले आहे .

त्यांना दिगंबरपंथीय मानणारा एक पक्षी आहे तर श्वेतांबर मानणारा दुसरा पक्ष आहे . दिगंबर ग्रंथातून त्यांच्यासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही . श्वेतांबर ग्रंथातून मात्र बरीच माहिती मिळते.

त्यांची ग्रंथसंपदा - आचार्यांनी वेगवेगळी ग्रंथरचना केली आहे . पण आज ते सर्व ग्रंथ उपलब्ध नाहीत . स्तोत्ररचनाही केली आहे . तसेच द्वात्रिंशिकाचीही रचना केली आहे . आचार्यांनी लिहिलेला 'सन्मतिसूत्र' हा एकच ग्रंथ त्यांना श्रेष्ठ ठरविण्यास पुरेसा आहे . हाच ग्रंथ सन्मतितर्क , सन्मतिप्रकरण , सन्मतितर्क प्रकरण या नावाने ओळखला जातो . हा ग्रंथ म्हणजे जैन वाङ्मयातील अनमोल रत्न आहे . तो संपूर्ण प्राकृत आहे . या ग्रंथाच्या अध्ययनाने साधूही सर्वदोषरहीत होतो . तीन खंडात या ग्रंथाची रचना केली आहे . नयकांड , जीवकांड आणि अनेकांतवाद अशी त्यांची नावे आहेत . पहिल्या नय कांडात नयविषयक सुंदर माहिती दिली आहे . द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक कांडाचे सुंदर विवेचन केले आहे व बाकीचे नय या दोन प्रकारांचेच भेद आहेत असे म्हटले आहे . द्रव्यार्थिक नयात द्रव्य , मुख्य व सामान्य असते आणि पर्याय विशेष , गौण असतो आणि पर्यायार्थिक नयात विशेष मुख्य आणि सामान्य गौण असते . पर्यायार्थिक नयाच्या दृष्टीने सर्व पदार्थ नियमाने उत्पन्न होतात आणि नष्टही होतात . द्रव्य पर्यायाशिवाय आणि पर्याय द्रव्याशिवाय असू शकत नाही . उत्पाद , व्यय , ध्रौव्य ही तिन्ही सत्द्रव्याची लक्षणे आहेत . असे विवेचन केले आहे .

या विवेचनानंतर दुस-या विभागात द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक हे दोन्ही नय एकमेकांना कसे पूरक आहेत , हे स्पष्ट केले आहे . एक नय जेव्हा दुस-या नयाची अपेक्षा न करता आपल्या विषयाला सतरू प प्रतिपादनाचा आग्रह धरतो तो मिथ्या नय होय . या प्रकाराचे वर्णन 'सन्मतिसूत्रात' आचार्यांनी केले आहे . त्यांनी तर उत्तरावर्ती नयाची चर्चा करताना त्यांना देखील मूलनयाप्रमाणे दुर्गम व सुनय म्हटले आहे आणि कोणत्याही एका नयाचा आधार घेऊन संसार , सुख , दुखः , बंध आणि मोक्ष यांचे यथार्थ निरू पण करता येणार नाही , हे स्पष्टपणे सांगितले आहे . म्हणून जे नय परस्परांच्या आधाराने वस्तूचे निरू पण करतात ते सम्यग्दृष्टी नय आहेत आणि जे स्वतंत्रपणे आपलाच पक्ष सिद्ध करू इच्छितात , ते मिथ्यात्वदृष्टीनय होत. दुस-या जीवकांडात जीवतत्वाची चर्चा केली आहे . त्याबरोबरच ज्ञानचर्चाही केली आहे . म्हणून त्याला ज्ञानकांड म्हणावे असे पं.

बेचरदासजींचे म्हणणे आहे . पण ज्ञान आणि दर्शन हे दोन्ही जीवद्रव्याचेच असल्यामुळे त्याचे जीवकांड हेच नाव अधिक योग्य आहे , असे पं. जुगलकिशोर मुख्तार यांचे मत आहे .

तिस-या कांडाला आचार्यांनी काही नाव दिले नाही पण डॉ. पी. एल. वैद्य यांनी त्याला अनेकांतवादाकांड असे नाव दिले आहे . आणि तेच योग्य आहे असे बहुतेकांचे मत आहे . कारण या कांडात अनेकांत दृष्टीने विचार केला आहे . या ग्रंथात एकूण १६७ गाथा आहेत . या कांडातही आचार्यांनी वेगळ्याच दृष्टीकोनातून नय चर्चा केली आहे . जितक्या वचनपद्धती आहेत तितक्याच नयवादपद्धती आहेत व जितके नयवाद आहेत तितकीच जैनेतरनयपद्धती आहे . त्यातच आचार्यांनी जैनेतरनयपद्धतीचीही माहिती दिली आहे . कपिलाच्या सांख्यदर्शनात द्रव्यार्थिक नयाला महत्व दिले आहे . बुद्धदर्शनात परिशुद्ध पर्यायनयाला महत्व दिले आहे . कणादाने आपल्या वैशेषिकदर्शनात दोन्ही नयांना मान्यता दिली आहे . याविषयीची माहिती गाथा नं. ४६ ते ४९ मध्ये दिली आहे . वरील दर्शनात सांगितलेल्या नयात एकांतिकता आहे म्हणून स्याद्वाद - अस्यादवाद या दोन्ही दृष्टीने त्याचा विचार झाला तर सम्यग्दर्शनाची प्राप्ती होईल .

आचार्य सिद्धसेनांनी परमताचे खंडन करू न जैनदर्शनानुसार आलेली नयपद्धतीच श्रेष्ठ आहे , हे उत्कृष्टरीतीने पटवून दिले आहे . कारण जैन दर्शनात समन्वयदृष्टी आहे . स्यात्वादनयात समन्वयाचा आधार घेतल्यामुळे सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य अनेकांत वादामुळेच झालेले आहे . म्हणून त्याचे महत्वही मोठे आहे . आचार्य अमृतचंद्र व आचार्य समंतभद्र यांनी याच मताचा पुरस्कार केला आहे .

त्यांचा हा ग्रंथ अत्यंत श्रेष्ठ व अनमोल आहे . जैनधर्माचा अभ्यास करणा-यांना तर हा उपयोगी आहेच , पण तौलनिक अभ्यास करण्यासाठी जैनेतरांना देखील हा उपयोगी आहे .

आचार्य सिद्धसेन दिवाकर यांचे आई-बाप , गुरू यासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही . पण त्यांच्याविषयी एक दंतकथा प्रसिद्ध आहे .

एकदा आचार्य विहार करत असताना जंगलातून जात होते . तेथे एका झाडाच्या ढोलीत पाखरांची ये-जा चालू होती . ते पाहून त्या पोकळीत काय आहे , असावे याचे त्यांना कुतुहल वाटले . त्यांनी हात घातला तर काहीतरी घट्ट वस्तुचा स्पर्श त्यांच्या हाताला झाला . त्यांनी ती वस्तु बाहेर काढली तर ती एक पोथी होती . ती चाळत असता त्यांच्या लक्षात आले की तो ग्रंथ तांत्रिक स्वरू पाचा आहे . त्यात अनेक प्रकारचे गूढ मंत्र आहेत . त्यांनी तो बराचसा मुखोदगत केला व अनेकांचे दु:ख दूर केले . असेच विहार करीत असता ते एका राज्यात आले . त्या ठिकाणी सर्वत्र उदासीनतेची छाया पसरली होती . चौकशी केली असता , त्या राजाचा एकुलता एक पुत्र मृत्युशय्येवर

पडून असल्याचे त्यांना समजले . ते राजवाड्यात गेले . त्यांनी त्या मरणोन्मुख राजकुमाराला पाहिले व राजाला सांगितले , राजा मी या कुमाराला बरे करतो . पण एक अट आहे , तू जैनधर्माचा स्वीकार केला पाहिजे . राजाने विचार केला , आपण इतके प्रयत्न केले , राजवैद्यांनी हात टेकले , पण राजकुमाराच्या प्रकृतीत फरक पडला नाही . आचार्यांच्या प्रयत्नांना यश आले तर राज्याचा वारस तर बरा होईल . कुमार बरा झाला तर जैन धर्म स्वीकारायला काय हरकत आहे . त्याने होकार दिला . आचार्यांनी थोडीशी पांढरी मोहरी मागवली . ती मंत्रून राजकुमाराच्या सभोवती टाकण्यास सांगितली आणि काय आश्चर्य ? मोहरी आजूबाजुला टाकल्या बरोबर कुमार
झोपेतून जागा झाल्यासारखा एकदम उठून बसला . सर्वजण आश्चर्यचकित झाले . राजाने जैनधर्माचा स्वीकार केला . राजाने त्यांना अतिशय थाटात ठेवले . राहण्यासाठी चांगला महाल दिला . जाणायेण्यासाठी पालखी दिली . सेवेसाठी लवाजमा दिला . रोज पालखीतून आपल्या लवाजम्यासहित ते राजदरबारात जात , तेव्हा त्यांचा थाट बघण्यासारखा असे .

आ. सिद्धसेनाच्या गुरुं ना जेव्हा हे हळले तेव्हा त्यांनी आचार्यांना परत बोलावले आणि आपल्यासारख्या साधूंचे हे काम नाही . तुम्ही मंत्रतंत्राचा प्रयोग करू  नका व पोथी जाळून टाका अशी आज्ञा केली . गुरू च्या आज्ञेने आचार्यांनी पोथी जाळून टाकली . पण अत्यंत मेधावी आणि एकपाठी असल्यामुळे त्यांना त्यातील बरेचसे मंत्र पाठ झाले होते.

यानंतर गुरू च्या आज्ञेने त्यांनी ग्रंथरचना केली . याच काळात , त्याच्या उपकृत राजावर परचक्र आले . राजाने एक घोडेस्वार आचार्यांकडे तातडीने पाठविला व आपले रक्षण करण्याची विनंती केली . आचार्यांनी गुरू च्या आज्ञेप्रमाणे स्थानत्याग करता येत नव्हता म्हणून त्यांनी पांढरी मोहरी मंत्रून दिली व ज्या ठिकाणी शत्रूसैन्य उभे होते , त्याच्यासमोर ती मोहरी पसरू न टाकण्यास सांगितले . त्याप्रमाणे त्या घोडेस्वाराने ती मोहरी पसरू न टाकली . तेव्हा त्या प्रत्येक मोहरीतून एक एक सैनिक निर्माण झाला व त्यांनी शत्रूंचा नि:पात केला . तेव्हापासून त्या राजाची आचार्यांविषयी व जैनधर्माविषयी श्रद्धा अधिकच दृढ झाली .

अशी ही दंतकथा आचार्यांविषयी प्रसिद्ध आहे .

# आचार्य भट्टालंक

आचार्य भट्टालंक हे अतिशय प्रकांड पंडित , धुरंधर शास्त्रार्थी व उत्कृष्ट विचारक होते . त्यांच्या काळात बौद्ध धर्माचे प्राबल्य वाढलेले होते . त्यामुळे जैन आचार्यांना आपले अस्तित्व टिकविण्यासाठी तर्काचा आधार घेऊन वादविवाद करू न , तर्काच्या आधारे आपले महत्व पटवून द्यावे लागे . त्यासाठी सतत प्रयत्न करावा लागे . म्हणून त्या काळच्या आचार्यांना जागरू क रहावे लागे आनि अशा या आचार्यांत भट्टालकांचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे . त्यांनी जैन न्यायाला चांगले स्वरू प दिले . त्या आधारानेच पुढील आचार्यांनी आपली न्याय ग्रंथरचना केली . ते दिगंबर संप्रदायी असले तरी श्वेतांबरांनाही पूजनीय होते . अनेक विद्वान त्यांना मानत असत . त्यांना जैन न्यायाचे सर्जन असे म्हटले जाते . त्यांच्या न्यायग्रंथाचा श्वेतांबर व दिगंबर दोन्ही पंथांनी कसलाही भेदभाव न करता पूणर्पणे स्वीकार केला आहे . त्यांच्या नावावरू न या न्यायाला ‘अकलंक न्याय’ असे म्हटले जाते . सिद्धसेनानंतर आचार्य अकलंकांनीच जैन वाङ्मय समृद्ध केले आहे . भारतीय साहित्याच्या चमकणा-या ता-यामध्ये यांना महत्वाचे स्थान आहे . त्यांच्यापुढे अनेक विद्वान नतमस्तक होतात .

भट्ट अकलंक

हे महान आचार्य असले तरी त्यांच्या जीवनाविषयी फारशी माहिती सापडत नाही . जी माहिती मिळते , ती केवळ दंतकथाद्वारे किंवा आख्यायिका किंवा इतर ग्रंथातून आलेल्या उल्लेखावरू नच मिळते . त्यामुळे त्याच्यावर किती विश्वास ठेवावा हा प्रश्नच आहे . यांच्या नंतरही अकलंक नावाचे बरेच आचार्य होऊन गेलेत . त्यांनीही अनेक ग्रंथांची रचना केली . पण ती एकाच अकलंकानी केली की अनेकांनी याचा स्पष्ट पुरावा मिळत नाही . आचार्यांचे नाव अकलंक देव असून भट्ट ही त्यांना मिळालेली उपाधी असावी , असेही मत प्रचलित आहे . उदा. कुमारील भट्ट , भट्ट प्रभाकर इ.

आचार्य भट्टाकलंक यांच्या जीवनाची थोडीबहुत माहिती प्रभाचंद्राने रचिलेल्या कथाकोष , ब्रह्मचारी नेमिदत्त यांच्या कथाकोषामधून तसेच कानडी भाषेतील राजावली ग्रंथातून मिळते .

आचार्य अकलंकाची जन्मभूमी ही मान्यखेट असून तेथील राजा शुभतुंगाचे मंत्री पुरुषोत्तम यांचे ते पुत्र होते . तत्वार्थराजवर्तिकामधील श्लोकावरू न ते राजपुत्र असावेत असे म्हटले आहे .

जीयाच्चिरमकलंकब्रह्मा लघुब्बनृपतिवरतनयः

अनवरतनिखिलविद्वज्जननुतविद्यः प्रशस्तजनहृद्यः

यावरू न दक्षिणेकडील लघुहब्ब नावाच्या राजाचे ते पुत्र असावेत.

*'राजावली' त* सांगितलेल्या कथेत ते कांची येथील जिनदत्त ब्राह्मणाचे पुत्र होते , असे म्हटले आहे . त्याकाळी कांची हे एक मोठे विद्यापीठ होते . येथेच आचार्य समंतभद्रांनी भेरी ताडन केले होते . त्यावेळी या भागात बौद्ध धर्माचे अतिशय प्राबल्य होते . या कांची नगराच्या आसपासच द्रविड राजा लघुहब्बाचे राज्य असून तेथेच अकलंकाचा जन्म झालेला असावा .

बौद्धपीठाप्रमाणे जैनराजांनी अनेक ठिकाणी आपली विद्यापीठे उभारली असावीत . पण त्यांचा फारसा उल्लेख मिळत नाही . संसारापासून विरक्त जैन आचार्य जंगलातच रहात असावेत आणि तेथेच विद्यार्थी त्यांच्याकडे शिकण्यासाठी रहात असावेत असा तर्क करण्यास हरकत नाही . अकलंकांचे धार्मिक शिक्षण असेच झाले असावे .

कथाकोशात अकलंकासंबंधी कथा अशी आहे . एकदा अष्टान्हिक पर्वात अकलंकाचे मातापिता त्यांच्या बंधु-निष्कलंकासह त्यांना घेऊन गेले . आठ दिवस धर्मोपदेश ग्रहण करू न मातापित्यांनी ब्रह्मचर्य व्रत धारण केले . पुत्रांनादेखील त्यांनी ब्रह्मचर्यव्रत दिले . दोघे भाऊ वयात आल्यावर मातापित्यांनी त्यांचा विवाह करण्याचे ठरविले . पण दोघांनीही त्याला विरोध करू न ब्रह्मचारी राहण्याचे ठरविले .

विद्याभ्यासासाठी बौद्ध गुरू भगवद्दास यांच्या आश्रयाला दोघेही भाऊ गेले . जैन असूनही आपण बौद्ध आहोत असे त्यांनी भासवले . एकदा त्यांचे गुरू सप्तभंगी संबंधी शिकवत असता , अर्धवट पाठ सोडून गेले . तेव्हा अकलंकांनी विद्यार्थ्यांना व्यवस्थित तो पाठ समजवून दिला . ही गोष्ट गुरू च्या ध्यानी येताच , अकलंक जैन आहे व त्याचा जैनधर्माचा अभ्यास झाला आहे , हे गुरू समजून चुकले . त्यांनी एक जैन मुर्ती तयार करू न ती ओलांडण्यास सांगितले . तेव्हा अकलंकांनी त्या मुर्तीवर एक धागा ठेवून ओलांडली . रात्री सर्व जण झोपल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याजवळ एकेक सैनिक उभा करू न जमिनीवर भांडी आपटून मोठा आवाज केला . तेव्हा या दोघा भावांनी पंचणमोकाराचा जप केलेला त्या सैनिकांनी पाहिला . आता आपल्या जीवितास धोका आहे हे जाणून दोघेही पळाले . घोडेस्वारांनी त्यांचा पाठलाग केला , तेव्हा अकलंकाचे पांडित्य , विद्वता जाणून हा जिवंत राहिला तर जैनधर्माचे मोठे काम करील म्हणून निष्कलंकाने त्याला तळ्यात लपण्यास सांगितले . अकलंक वाचला . पण निष्कलंक मात्र सैन्याकडून मारला गेला .

राइस यांनी वेगळीच कथा सांगितली आहे . अकलंक एवढा विद्वान कसा म्हणून त्याच्या गुरू ने तो झोपला असता , त्याच्या छातीवर बुद्धाचा हात ठेवला . त्यावेळी तो एकदम जागा होऊन

‘जिनसिद्ध’ असे उद्‌गार त्याच्या तोंडून निघाले , तेव्हा तो जैन असल्याचे त्याच्या गुरू ला कळाले म्हणून तो पळून गेला .

तिस-या एका कथेत असे सांगितले आहे की गुरू  एकदा पाठ शिकवित असता बाहेर गेले तेव्हा अकलंकाने त्यांच्या हस्तलिखित पुस्तकात ‘सम्यग्‌दर्शनज्ञानचरित्राणि मोक्षमार्ग:’ असे लिहून ठेवले . तेव्हा तो जैन असल्याचे गुरू ला कळले व त्याने त्याला ठार मारण्याचा निश्चय केला , तेव्हा त्याला धोब्याच्या कपड्याच्या गाठोड्यात लपवून बाहेर काढण्यात आले . नंतर ते दीक्षा घेऊन सुधापूर येथे देशीयगणाचे आचार्य झाले .

या वेगवेगळ्या आख्यायिकावरू न एकच गोष्ट निश्चित होते की त्यांनी जैन असल्याची गोष्ट लपवून बौद्ध गुरू जवळ बौद्ध धर्माचा अभ्यास केला आणि त्यामुळे त्यांच्यावर प्राणसंकट आले होते . या सर्व गोष्टींना ऐतिहासिक पुरावा मिळत नाही .

त्यावेळी भारतात बौद्ध धर्माचा प्रसार खूप झालेला होता . त्यांना राजाश्रयही मिळालेला होता . त्यामुळे त्यांचे गुरू  आपले महत्व वाढविण्यासाठी इतरांना वादविवादाला आव्हान देत . अशा अनेक बौद्धगुरूं ना आचार्य अकलंकांनी आपल्या विद्वत्तेने आपल्या तार्किक विचारसरणीने वादात हरविल्याचा उल्लेख सापडतो . त्यामुळे त्यांना ‘तार्किकलोकमस्तकमणि’ ‘इतरमतावलंबीवादिरू पी’ ‘सकलतार्किकचूडामणि मरीचि मेचकित चरणनखकिरणो’ भगवान भट्टालकलंकदेव अशा विशेषणांनी गौरविले आहे . यावरू न ते अत्यंत विद्वान आणि इतरांची मते खोडून काढण्यात अतिशय तरबेज होते , हे सिद्ध होते .

*आ. भट्टालकांच्या* काळासंबंधीही असेच मतभेद आहेत . राजा शुभतुंगाच्या मंत्र्याचे ते पुत्र आहेत , ही गोष्ट इतिहासाकारांनी मान्य केली आहे . डॉ. के बी. पाठक यांनी अकलंकांना पहिल्या कृष्णराजाच्या काळातील म्हणजे इ. स. ७५० हा काळ निश्चित केला आहे . पं. नाथूराम प्रेमींनी याच आधारावर त्यांचा काल वि. सं. ८१० ते ८३२ हा मानला आहे . ‘जैत लक्षणावली’ या ग्रंथात इ. स. ७२० ते ७८० ( वि. सं. ७७७ ते ८३७ ) हा काळ मानला आहे . ‘जैनसिद्धांतकोश’ मध्ये अकलंकांचा काल इ. स. ६६० ते ६८० हा मानला आहे . या सर्व गोष्टीवरू न त्यांचा काल इसवीसनाच्या ७ व्या व ८ व्या शतकाचा असावा .

आ. अकलंकांच्या विद्वत्तेचा , बुद्धीमत्तेचा लेखनशैलीचा परिचय त्यांच्या ग्रंथाचे अवलोकन केल्याशिवाय होत नाही . त्यांचे गद्यपद्यलेखन सूत्रात्मक पद्धतीचे आहे . गागरमे सागर या पद्धतीने थोडक्यात मोठ्यात मोठा गहन विषय मांडला आहे . स्वत:च्याच ग्रंथावर त्यांनी भाष्य लिहिले आहे .

पण ते इतके क्लिष्ट आहे की मोठमोठ्या आचार्यांना देखील ते कठीण वाटले . त्यांच्या साहित्यावर अनंतवीर्यांनी आणि स्याद्‌वादविद्यापती विद्यानंद यांनी टीका लिहिली आहे .

आचार्य अकलंकांची साहित्यरचना दोन प्रकारची आहे . एक म्हणजे पूर्वाचार्यांच्या ग्रंथावर त्यांनी लिहिलेले भाष्य व दोन , स्वतंत्र रचना . पहिल्या प्रकारात तत्वार्थराजवार्तिक व अष्टशती या दोन ग्रंथाचा समावेश आहे . दुस-या प्रकारात लघीयस्त्रय , न्यायविनिश्चय , सिद्धिविनिश्चय , प्रमाणसंग्रह , स्वरू पसंबोधन , बृहत्‌त्रय , न्यायचूलिका , अकलंकस्तोत्र , अकलंक प्रायश्चित आणि अकलंकप्रतिष्ठापाठ या ग्रंथांचा समावेश आहे .

तत्वार्थराजवार्तिक

आ. उमास्वामींनी लिहिलेल्या तत्वार्थसूत्रावरील हे भाष्य आहे . दिगंबर मतप्रणालीप्रमाणे या ग्रंथात सात तत्वांचे विवेचन केले आहे . हा ग्रंथ १० अध्यायात विभागला असून त्याची टीकाही दहा अध्यायातच आहे . या ग्रंथाचीही भाषा प्रौढ आणि गहन असून आचार्यांनी दार्शनिक , सैद्धांतिक व महान व्याकरणकार अशी भूमिका घेतलेली आहे . अष्टशती , आ. समंतभद्रांच्या आप्तमीमांसा या ग्रंथावरील हे भाष्य असून यात ८०० श्लोक आहेत म्हणून त्याला अष्टशती असे म्हटले आहे . स्वामी विद्यानंदनी या अष्टशतीवर 'अष्टसहस्त्री' टीका लिहिली आहे व अष्टशतीतील रहस्य स्पष्ट केले आहे . यात बौद्ध , चार्वाक , मीमांसक यांच्या एकांतवादावर टीका करू न अनेकांतवादाचा पुरस्कार केला आहे .

लघीयस्त्रय -

यात ७८ कारिका असून हा ग्रंथ सहा परिच्छेदात विभागला आहे . या ग्रंथाची रचना अष्टशतीतील विषयाशी मिळतीजुळती आहे .

न्यायविनिश्चय

या ग्रंथात तीन प्रकरणे असून त्यात प्रत्यक्ष , अनुमान , प्रवचनप्रमाण याचे विवेचन केले आहे . कारिकांची संख्या ४८० आहे . पहिल्या प्रस्तावात बौद्ध विकल्प लक्षण , विज्ञानवाद , नैरात्म्यवाद , परमाणुवाद , यावर टीका केली आहे . . तसेच सांख्य व नैय्यायिकांच्या मताचे खंडन केले आहे . दुस-

या प्रस्तावात साध्य , साधन , हेत्वाभास , प्रत्यभिज्ञा , तर्क व जाती व वाद यांचे सुंदर विवेचन केले आहे . जीवस्वरू पाच्या चैतन्याबाबत चार्वाक व वैशेषिकांच्या मताचे खंडन केलेले आहे . तिस-या भागात मोक्ष व सर्वज्ञाचे विवेचन करू न बौद्धाच्या ब-याच गोष्टींचा उपहास केला आहे .

सिद्धिविनिश्चय यात १२ प्रस्ताव असून प्रत्यक्षसिद्धि , सविकल्प सिद्धि , प्रमाणोत्तरसिद्धि , जीवसिद्धि , जल्पसिद्धि , हेतुलक्षणसिद्धि , शास्त्रार्थसिद्धि , सर्वज्ञसिद्धि , शब्दसिद्धि , अर्थनयसिद्धि , शब्दनयसिद्धि , व निक्षेपसिद्धि , अशी प्रकरणे आहेत .

याशिवाय प्रमाणसंग्रह , बृहत्‌त्रय , अकलंकस्तोत्र इ. अनेक रचना आचार्य अकलंकाच्या आहेत .

एकंदर आचार्य अकलंकाचे व्यक्तित्व पाहिले तर जैन न्याय साहित्यातील ते एक असामान्य विद्वान होऊन गेले , यात शंका नाही . त्यांचे तर्कआणि विचार प्रणाली अनुपम होती . अत्यंत थोड्या शब्दात विपुल असे तत्वज्ञान त्यांनी सांगितले आहे . त्यांची ग्रंथरचना विचारप्रवण आणि संशोधन प्रवण आहे . शब्द न शब्द अर्थप्रचूर आहे . ते दार्शनिक तर होतेच पण उपहासगर्भ लिखाणातही त्यांचा हातखंडा होता . बौद्ध मताचे खंडन करणे ही त्या काळाची गरज होती . आणि आचार्यांनी ती अत्यंत कलात्मकतेने पूर्ण केली आहे . त्यांच्या अवर्णनीय ग्रंथसाहित्यातून त्यांची विद्वत्ता आत्मविश्वास , प्रभावीपणा व वैचारिकता यांचा पदोपदी प्रत्यय येतो . म्हणून त्यांचे कार्यही मेरू पर्वताप्रमाणे विशाल व उत्तुंग आहे .

## आचार्य रविषेण

आचार्य रविषेणांनी ‘पद्मपुराण’ नावाच्या अप्रतिम ग्रंथाची रचना करू न आपले नाव अजरामर केले आहे . एकाच ग्रंथाने त्यांनी साहित्याच्या प्रांगणात ध्रुवता-याचे स्थान मिळविले आहे . त्यांचा हा ग्रंथ अत्यंत प्राचीन व श्रेष्ठ समजला जातो .

इतर अनेक आचार्याप्रमाणे आ. रविषेणाची देखील माहिती मिळत नाही . त्यांच्या ग्रंथातही त्यांनी स्वत:संबंधी काही माहिती दिलेली नाही . आ. रविषेण हे अर्हन्मुनीचे शिष्य लक्ष्मणमुनि यांचे शिष्य होते . अर्हनमुनीचे गुरू दिवाकर होते . त्यांच्या नावाला सेन हा प्रत्यय लावल्यामुळे ते सेनसंघाचे असावेत असा अंदाज व्यक्त केला जातो .

उद्योतनसूरींनी लिहिलेल्या कुवलालयमाला ग्रंथात पद्मपुराणाची स्तुती केली आहे . पुन्नाटसंघीय जिनसेनानेही आपल्या हरिवंशपुराणात रविषेणाच्या पद्मपुराणाची स्तुती केली आहे . तो काळ इ. स. ८४० चा होता . जैन लक्षणावलीमध्ये पद्मपुराण हा ग्रंथ इ. स. ७३३ मध्ये लिहिल्या गेल्याचा उल्लेख आहे . भारतीय ज्ञानपीठाने प्रसिद्ध केलेल्या जैनसिद्धांतकोषमध्ये रविषेणाचा काल इ. ६४३ ते ६८३ हा दिला आहे . आणि ते सेनसंघाचे असल्याचा उल्लेख करू न सेनसंघाची माहिती दिली आहे . सेनसंघाची स्थापना अर्हत्बलीने वीरनिर्वाण संवत ५९३ मध्ये केली होती . त्याच्या गुर्वावलीमध्ये रविषेणाचा उल्लेख आहे . याशिवाय जास्त माहिती उपलब्ध नाही . जैन साहित्यात या ग्रंथाला मानाचे स्थान आहे . यात रामाचे चरित्र आहे . हा ग्रंथ विविध घटनांनी युक्त असून अतिशय रोचक आहे . यातील कथेचा नायक पद्म म्हणजे राम आहे . त्याच्या जन्मापासून मुक्तीपर्यंतच्या सर्व घटनांचा यात उल्लेख आहे . ही ग्रंथरचना जैन धर्माला अनुकूल अशी अहिंसात्मक आहे . आदर्श माता , आदर्श पिता , आदर्श बंधू , आदर्श राजा यांची उदाहरणे चरित्राने घालून दिली आहे .

रावणाचे चित्रही यात चांगलेच रंगवले आहे . रावण विद्वान , बलाढ्य , पराक्रमी व व्रतपालन करणारा होता . सीताहरण प्रकरण सोडले तर रावण हा चारित्र्यसंपन्न आणि शुद्ध होता असे वर्णन आहे . अंजना पवनंजयाची कथा व मारू तीच्या जन्माचेही यात वर्णन आहे.

*श्रीराम* हे जैनांचे आठवे बलभद्र व लक्ष्मण हे आठवे नारायण मानले गेले आहेत . स्वयंभू कवीने ‘पद्मचरित्र’ या आपल्या ग्रंथात आ. रविषेणाविषयी लिहिताना असे म्हटले आहे , ही रामकथारू पी नदी भ. महावीराच्या मुखातून निघाली . या वाहणा-या नदीला गणाधरांनी पाहिले व गुणालंकृत धर्माचार्यांनाही ती पाहिली . नंतर प्रभव मुनिराजांनी तिचे अवलोकन केले . पुन: त्या रामकथारू पी नदीला अनुत्तरवादी कीर्तीश्वर व रविषेण आचार्यांनी पाहिले व स्वयंभूदेव कवीने त्या रामकथारू पी नदीत अवगाहन केले .

आचार्यांनी या ग्रंथात पराकाष्ठेची रोचकता आणून त्या कथेला हिमगिरीतून वाहत येणा-या मंदाकिनीसारखे ओघवती केलेले आहे . एकदा हातात घेतल्यावर पूर्ण वाचल्याशिवाय तो ग्रंथ हातावेगळा करावासा वाटत नाही . यातच चरित्रकाराची थोरवी दिसून येते .

महान आध्यात्मिक टीकाकार

## आचार्य अमृतचंद्र

आचार्य कुंदकुंदाच्या ग्रंथाचे भाष्यकार आणि आ. उमास्वामीच्या तत्वार्थसूत्रावर टीका करणारे आचार्य अमृतचंद्र सूरी हे एक अतिशय विद्वान , समीक्षक आणि विचारवंत आहेत . त्यांच्या मातापित्याविषयी किंवा त्यांच्या गुरू विषयी काहीच माहिती मिळत नाही . ग्रंथाच्या शेवटी असलेल्या प्रशस्तिमध्ये सुद्धा त्यांनी आपली काहीच माहिती दिली नाही . एका ग्रंथाच्या शेवटी मात्र त्यांनी म्हटले आहे . “वर्णांनी पदे तयार होतात . पदांनी वाक्ये आणि वाक्यांनी शास्त्र तयार होते .” यातून त्यांची प्रसिद्धपराड्मुखताच स्पष्ट होते .

त्यांनी आपल्या ग्रंथातून मंगलाचरणामध्ये मंगलस्वरू प जिनेंद्राची ज्ञानज्योत सतत जळत राहण्याची भावना प्रकट केली आहे . ते आध्यात्मवादी होते . त्यांनी कुंदकुंदांच्या समयसार . ( प्राभृत ) प्रवचनसार , पंचास्तिकाय या आध्यात्मिक ग्रंथावर टीका लिहिली आहे . तसेच तत्वार्थसूत्र या सूत्रमय ग्रंथाचा पद्यानुवाद केला आहे . त्यावरू न त्यांचा अनेकांतवादाचा सखोल अभ्यास दिसून येतो . अनेकांतवादाला परमागमाचे बीज मानून एकांतवादांचा समन्वय करणारे म्हटले आहे . अनेकांतवादाचे विश्लेषण त्यांनी अतिशय पांडित्यपूर्ण केले आहे . त्यामुळे काही ठिकाणी त्यांची भाषा थोडी कठीणही झाली आहे . त्यांची रचनाशैली प्रगल्भ आणि चित्ताकर्षक वाटते .

वर सांगितल्याप्रमाणे त्यांच्या काळाविषयी व जीवनाविषयी माहिती मिळू शकत नाही . पं. आशाधरांनी आपल्या भव्य कुमुदचंद्रिका टीकेत त्यांचा ठाकूर असा उल्लेख केला आहे . ‘एतच्च विस्तरेण ठक्कुरामृतचंद्रसूरिविरचितसमयसारटीकाआं द्रष्टव्यम्’ ( पृष्ठ ५८८ ) अर्थात ठक्कुर आणि ठाकूर हे एकच आहे . त्यामुळे त्यांचा जन्म ठाकूर घराण्यात झाला असावा असे मानण्यास हरकत नाही . आ. शुभचंद्रांनी आपल्या ग्रंथात त्यांचा उल्लेख केला आहे . त्यामुळे ते शुभचंद्राच्या आधीच्या काळात होऊन गेले . असे मानावे लागेल . यावरू न त्यांचा काळ विक्रम संवत १२ व्या शतकाच्या सुमारास मानावा लागेल .

अपभ्रंश भाषेतील ‘प्रद्युम्न चरित’ मध्ये आ. अमृतचंद्र सूरी यांच्यासंबंधी थोडीशी माहिती मिळते . ते मलधारी माधवचंद्राचे शिष्य होते . एकदा विहार करीत करीत ते बांभणवाडा नावाच्या नगरात आले होते . त्यांच्याच प्रेरणेने सिंह कवीने प्रद्युम्न चरित्राची रचना केली . येथील राजा गुहीलवंशी क्षत्रिय असून मालवनरेश बल्लाळाचा मांडलिक होता . या बल्लाळाचा चालुक्य कुमारपालाने पराजय

केला . कुमारपालाचा काल विक्रम संवत् १२२९ असा मानला आहे . म्हणून प्रद्युम्नचरित्राचा रचनाकाळ आणि आ. अमृतचंद्राचा काळ तोच आहे असे मानता येईल .

डॉ. ए. एन्. उपाध्ये यांच्या मतानुसार आ. अमृतचंद्राचार्यांचा उल्लेख कोणत्याही शिलालेखात सापडत नाही . त्यांनी काही उतारे आ. सिद्धसेनापासून घेतले आहेत . म्हणून त्यांचा काळ ७ व्या शतकातील नसावा .

काळ कोणताही असला तरी त्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक ज्ञानात किंवा विद्वत्तेत फरक पडत नाही . त्यांनी आचार्य कुंदकुंदाचे आध्यात्मिक ज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोचविले , ही त्यांची मोठीच कामगिरी आहे . त्यांची ग्रंथसंपत्तीही विपूल आहे . १) पुरुषार्थसिद्धयुपाय २) तत्वार्थसार ३) लघुतत्वस्फोट ४) समयसाराची आत्मख्याति टीका ५) प्रवचनसार टीका ६) पंचास्तिकायटीका

१) पुरुषार्थसिद्धयुपाय - या ग्रंथात आचार्यांनी मनुष्याचा पुरुषार्थ आणि तो प्राप्त करण्यासाठी करण्याचे उपाय वर्णन केले आहेत . त्यांनी आपल्या बुद्धिद्वारे जिनधर्माचा जो प्रगाढ अभ्यास करू न पुरुषार्थ मिळविला , त्याचेच अत्यंत प्रासादिक भाषेत वर्णन केले आहे . हाग्रंथ त्याची स्वतंत्र रचना आहे . यात त्यांनी पाच अधिकार ( विभाग ) केले असून त्यांची नावे सम्यग्दर्शनाधिकार . सम्यग्ज्ञानाधिकार , सम्यक्चारित्र्याधिकार , सल्लेखनाधिकार व चरित्राधिकाराचे वर्णन केले आहे . जैनांच्या सर्व आचार , बारा व्रते , रत्नत्रय व सल्लेखना याचे सविस्तर वर्णन केले आहेत . यात पुरुष , चिदात्म्याला म्हटले असून तो स्पर्शविरहीत असून ज्ञानाराधनेत मग्न असतो . उत्पाद - व्यय - ध्रौव्य या द्रव्यलक्षणांनी तो युक्त असतो . कर्मचेतना , ज्ञानचेतना व कर्मफलचेतनानी तो युक्त असतो . विकाररहीत राहून ज्ञायकरू प व चैतन्यरू प धारण करणे हीच पुरुषार्थाची सिद्धी होय , असे त्यात म्हटले आहे . पुरुष व चिदात्मा याचे ते रू पक आहे .

लघुतत्वस्फोट - यालाच शक्तिमणिकोश असेही म्हणतात . हा ग्रंथ बरीच वर्षे दिगंबर संप्रदायाला माहित नव्हता . त्याची एक ताडपत्राची प्रत अहमदाबाद येथील श्वेतांबर मंदिराच्या भांडारात सापडली . यात ६२५ श्लोक आहेत . यात आचार्यांनी जैन तत्वांचे व अनेकांताचे सरस विवेचन केले आहे . भाषा पांडित्यपूर्ण असल्यामुळे थोडी कठीण झाली आहे . सुरुवातीच्या विनयावलीत २४ तीर्थंकरांची नावे असून सत्-असत् , द्वैत-अद्वैत , नित्य-अनित्य या गोष्टींच्या वर्णनाने

अनेकांतवादाची जिननामावलीत गुंफण केली आहे . आत्मख्याती टीका ही समयसारावरील टीका आहे . प्रवचनसारावरील तत्वदीपिका , पंचास्तिकायावरील तत्वप्रदीपिका याही टीका आहेत .

अमृतचंद्राचार्य हे गद्यापेक्षा पद्य कवी म्हणूनच अधिकच प्रभावशाली आहेत . त्यांची भाषाशैली प्रासादिक आहे . त्यांचा
तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास असल्यामुळे त्यांना अनेकांतवादाचे अत्यंत आकर्षण होते . त्यामुळे त्याचे विवेचन अतिशय उत्तम रीतीने झाले आहे . त्यांचा 'समयसार कलश' हा ग्रंथ गेयरचना रू पाचा आहे . त्यांच्या भाषाशैलीचा प्रभाव त्यांच्यानंतर झालेल्या जयसेन व पद्मप्रभदेव यांच्यावर पडलेला आहे . 'शांतरसाच्या मदतीने आध्यात्माचा महान आशय या आचार्यांनी अतिशय सुंदर भाषेत व्यक्त केला आहे . त्यांचे हे ऋण कोणताही जैन माणूस कधीच विसरू शकणार नाही.'

तत्वार्थसार - ही तत्वार्थसूत्रावरील पद्यात्मक स्वतंत्र व्याख्या आहे . तो अनुष्टुभ छंदात लिहिला आहे . दिगंबर व श्वेतांबर दोन्ही संप्रदायांना तो मान्य आहे . यात सात तत्वे जीवतत्त्व , अजीवतत्व , आस्त्रव बंध , संवर , निर्जरा आणि मोक्ष यांचे वर्णन आहे .

## महाकवी आचार्य जिनसेन

आचार्य जिनसेन हे आदिपुराणाचे कर्ते म्हणून प्रसिद्ध आहेत . त्यांनी अनेक पुस्तके लिहिली . पण त्या सर्वात आदिपुराण हे महाकाव्य अतिशय प्रसिद्ध आहे . म्हणून ते आदिपुराणकार जिनसेनाचार्य म्हणूनच ओळखले जातात . आ. जिनसेन हे आचार्य वीरसेनाचे शिष्य होत . हरिवंशपुराणकर्ते आ. जिनसेनापासून वेगळे आहेत .

यांचा जन्मही दक्षिणेकडील कांचीपुरमच्या आसपासचा असावा . त्यावेळी जैन उपाध्याय हे स्वत:ला जैन ब्राह्मण म्हणवून घेत . तसेच त्यांचे घराणे राजाश्रित असावे असे वाटते . आणि त्यांच्या काळात दक्षिणेकडे जैनधर्माचा प्रभाव अधिक असल्यामुळे त्यांच्या कुलाला राजाश्रय मिळाला असावा . ते स्वत:ला 'अविद्धकर्ण ' म्हणवून घेतात . म्हणजेच त्यांचे कान टोचले नव्हते . त्यांनी बालवयातच

दीक्षा घेतली असावी . असे आढळून येते . बालवयात त्यांनी ब्रह्मचर्याचे कठीण व्रत स्वीकारले . असे म्हणतात की त्यांचे हे तपस्वीरू प पाहून देवी सरस्वती त्यांच्यावर मोहित झाली होती . दोन्ही कर्ण अविद्ध असूनसुद्धा ज्ञानशलाकेने ते वेधले गेले होते . अर्थात कान टोचण्यापूर्वीच त्यांनी दीक्षा घेतली असावी . स्वत: अतिशय रू पवान व चतुर असूनसुद्धा त्यांनी अनन्यभावाने देवी सरस्वतीची उपासना केली . शरीर तपाने कृश असूनही ते कृश नव्हते . त्यांना तत्वज्ञानी लोकांनी 'ज्ञानमयोपिंड' 'ज्ञानशरीरी' अशा उपमा देऊन त्यांचा गौरव केला आहे . त्यांच्या पार्श्वाम्युदय ग्रंथातील प्रशस्तीमधून एवढीच माहिती मिळते .

भ. महावीरांच्या निर्वाणानंतर सुमारे ७०० वर्षांनी मूलसंघाची स्थापना झाली . त्यांचे पुढे नंदिसंघ , देवसंघ , सेनसंघ व सिंहसंघ असे चार भेद झाले . आचार्य जिनसेन आणि त्यांचे शिष्य गुरू भद्र यांनी सेनसंघाची दीक्षा घेतली असावी . आ. चंद्रसेनाचे शिष्य आर्यनंदी - वीरसेन - जिनसेन गुणभद्र व लोकसेन अशी ही परंपरा असावी . जयधवल टीकेत श्रीपाल , पद्मसेन आणि देवसेन यांचा उल्लेख आहे . त्याअर्थी ते त्यांचे गुरू बंधू असावेत . त्यांचे शिष्य विनयसेन यांनी विनंती केल्यावरू न त्यांनी पार्श्वाभ्युदय काव्य रचना केली आहे . जिनसेनानंतर विनयसेन व विनयसेनानंतर गुणभद्र आचार्य झाले असावेत .

गुणभद्राचार्यांनी उत्तर पुराणाच्या प्रशस्तीमध्ये आचार्य जिनसेनाचा उल्लेख करताना , म्हटले आहे , "हिमालयापासून गंगेचा , सर्वज्ञाच्या मुखातून , सर्वशास्त्ररू पी धनीचा , उदयाचलाच्या तटापासून दैदिप्यमान सूर्याचा उदय होतो , तसा आचार्य वीरसेनापासून आचार्य जिनसेनाचा उदय झालेला आहे." अशा या श्रेष्ठ आचार्याकडून उत्तमोत्तम ग्रंथांची रचना होणे स्वाभाविकच आहे . त्यांनी

१) पार्श्वाभ्युदय २) आदिपुराण ३) वर्धमान पुराण ४) पार्श्वस्तुती ५) जयधवल टीका ६) द्रौपदिबंध ही ग्रंथरचना केली आहे .

पार्श्वाभ्युदय - या ग्रंथाची मध्यवर्ती कल्पना थोडक्यात अशी . श्री पार्श्वनाथ भगवान दीक्षाकल्याणानंतर योग धारण करतात . त्यांचा पूर्वभवातील शत्रू कमठ हा संबर नावाचा जोतिष्क देव होतो व अवधिज्ञानाने आपला वैरी समजून , त्यांच्यावर संकटे आणतो . मंद्राकांता वृत्तांत या काव्याची रचना आहे . ३३४ श्लोकांचे हे खंडकाव्य आहे . मेघदूत काव्याची समस्यापूर्ती करावी , असे हे काव्य आहे . ३ ओळी इतर व चवथी ओळ ही मेघदूताची पहिली ओळ अशी या काव्याची रचना आहे . या ग्रंथाची भाषाशैली अत्यंत मनोरम आहे . वास्तविक मेघदूताचा विषय वेगळा तरी विषय

मांडण्याचे कौशल्य दाखविले आहे . एवढेच नव्हे तर त्यात कोठेही रसभंग झालेला नाही , निरसता आलेला नाही .

२) आदिपुराण - आदिपुराण हा महापुराणाचा प्रथम खंड आहे . यात ४७ पर्व आहेत . त्यापैकी ४२ पर्व आणि ४३ व्या पर्वातील पहिले ३ श्लोक आचार्य जिनसेनांनी रचले आहेत . बाकीचे पाच पर्व आणि उत्तर पुराण आचार्य गुणभद्रांनी पूर्ण केले आहे . हा ग्रंथ पुराण असूनही काव्यात्मक रचलेला आहे . त्याला महाकाव्य असेही म्हणतात . संस्कृत साहित्यातील तो एक अमोल ग्रंथ आहे . त्याचा विषय म्हणजे भ. ऋषभ नाथ आणि त्यांचा पुत्र भरत चक्रवर्ती याचे चरित्र त्यात आहे . त्यात त्यांच्याशी संबंधीत अशा अनेक महापुरुषांच्या कथाही सांगितल्या आहेत . निसर्गवर्णन , शृंगारिक , राजवैभव , शौर्य , वैराग्य यांची अत्यंत बहारदार वर्णने यात आहेत . अनेक नावांनी त्यांनी भगवंताचे भक्तीपूर्ण तल्लीन होऊन वर्णन केले आहे . समवसरणाचे वर्णन तर इतके चित्रमय आहे की आपण त्या समवशरणात आहोत असा भास होतो . हा ग्रंथ अनुष्टुभ छंदात असून श्लोकांची संख्या ११,४२९ आहे . यात सुभाषितांची भरमार आहे . हा ग्रंथ म्हणजे युगाच्या प्रारंभीचा एक महान इतिहास आहे .

## आचार्य विद्यानंद

'स जयतु विद्यानंदा रत्नत्रय भूरि भूषणः सततम्'
तत्वार्थऽर्णवतरणे सदुपायः प्रकटितो येन'

जैन आचार्यात विद्यानंद अनेक होऊन गेले . पण ९ व्या शतकात झालेल्या *अष्टसहस्त्रीकार* आचार्य विद्यानंद यांच्या तोडीचा विद्वान , दार्शनिक , न्यायग्रंथाचे प्रणेते , तार्किक्र चूडामणि हे एकमेव होते . आप्तपरिक्षा ग्रंथाच्या प्रशस्तीमध्ये ते स्वतःसंबंधी सांगताना 'रत्नत्रयविभूषित आणि तत्वार्थरू पी सागर तरू न जाण्याचा उपाय सांगणारे' असे म्हणतात . आणि ते खरेच आहे .

वादिभराजसूरीनेदेखील 'अनवद्यचरण' म्हणजे निष्कलंक चारित्र्य असणारे अशी त्यांची स्तुती केली आहे .

आ. विद्यानंदासंबंधी फारशी माहिती मिळत नसली , तरी तत्वार्थश्लोकवर्तिक आणि अष्टसहस्त्री ग्रंथातून त्यांच्या निर्दोष चारित्र्याची माहिती मिळते . त्यांच्या वेगवेगळ्या ग्रंथाच्या प्रशस्तीमधून त्यांच्या समकालीन शिवमार द्वितीय आणि रायमल्ल सत्यवाक्य ९ व्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेल्या गंगराजासंबंधी उल्लेख केलेला आढळतो . पूर्वीचे गंग राज्य म्हणजे आताचे म्हैसूर राज्यातील गंगवाडी हे होय . गंगराज्याचा काळ ४ थ्या शतकापासून ११ व्या शतकापर्यंत होता , असे मानतात . त्या काळात जैनधर्माचा प्रसार भरपूर झाला होता . आणि त्याला राजाश्रयही मिळाला होता . म्हणून बरीचशी ग्रंथसंपदा त्याच काळात निर्माण झाली . त्यामुळे गंगराज्य जैनांना आदरणीय समजत होते . अशा समृद्धीच्या , सुबत्तेच्या आणि सरस्वतीला अनुकुल असलेल्या काळात आचार्य विद्यानंदांना भरपूर ग्रंथरचना करता आली , यात नवल ते काय ? या सर्वांवरू न आ. विद्यानंदाचा काळ इ. स. ७७५ ते ८४० हा मानला जातो .

त्यांचे साधुजीवन अतिशय पवित्र होते . चरित्र अनिंद्य होते . तपाचरणासंबंधी त्यांना आस्था होती . तपाने काय क्लेश होतात . त्यामुळे दु:ख होते असे मानणा-या लोकांना त्यांनी सडेतोड उत्तर दिले आहे . तपाचरणापासून साधूंना दु:ख होत नाही . उलट त्यात त्यांना आनंद मिळतो . नाहीतर स्वर्ग व मोक्ष मिळविण्याची सर्व साधने दु:खमय मानावी लागतील , असे म्हणून त्यांनी तत्वार्थसूत्राचे विश्लेषण करताना दिगंबरत्वाचे जोरदार समर्थन केले आहे .

आ. विद्यानंद उच्चकोटीचे चारित्र्यसंपन्न तपस्वी तर होतेच पण भारतातील सर्वपंथीय तत्वइ ाानाचे ते गाढे अभ्यासकही होते . जेव्हा ते चार्वाकादी प्रतिपक्षांच्या मताचे खंडण करतात , तेव्हा त्यांच्या लेखणीला धार चढते . त्यांचे तर्कपूर्ण व अभ्यासू विवेचन पाहून , सूक्ष्म विचारशैली व इ ाानभांडार पाहून भारतीय दार्शनिक नतमस्तक होतात . त्यांच्या प्रतिभेच्या उत्तुंगतेची कल्पना एका छोट्याशा उदाहरणावरू न मिळते . आचार्य मूर्धन्यपिच्छ यांनी जे गुण आणि पर्याययुक्त आहे , ते द्रव्य अशी द्रव्याची व्याख्या केली आहे . यावर अशी शंका घेतल्या गेली की गुण ही संज्ञा इतर दार्शनिकांची आहे . जैनांची नाही . जैन दर्शनाप्रमाणे वस्तु ( द्रव्य ) आणि पर्यायरू पच मानली आहे . त्यामुळे ती *द्रव्यार्थिक* व *पर्यायार्थिक* नयाने युक्त आहे . जर वस्तु गुणरू प असेल तर गुणार्थिक हा तिसरा नय मानावा लागेल.

यावर आ. विद्यानंदांनी आपल्या विद्वत्ताप्रचूर आणि सूक्ष्म विचारबुद्धीने उत्तर दिले आहे . त्यांच्या मते वस्तू दोन प्रकारच्या अनेकांतांनी युक्त आहेत . सहनेकांत आणि क्रम अनेकात . सहअनेकांताचे

ज्ञान मिळविण्यासाठी गुणयुक्त व क्रमानेकान्ताच्या सिद्धिसाठी पर्याययुक्ताला द्रव्य म्हटले आहे . म्हणून गुण तथा पर्याय या दोन्ही शब्दांचा द्रव्यलक्षणात समावेश करणे योग्य आहे .

आचार्य विद्यानंदांनी एकूण नऊ ग्रंथांची रचना केली आहे . १) विद्यानंद महोदय २) तत्वार्थ श्लोकवार्तिक ३) युक्त्यनुशासनालंकार ४) अष्टसहस्त्री ५) आप्तपरीक्षा ६) प्रमाणपरीक्षा ७) पत्रपरीक्षा ८) सत्यशासनपरीक्षा ९) श्रीपुरपार्श्वनाथ स्तोत्र .

२) त्यापैकी विद्यानंद महोदय हा ग्रंथ उपलब्ध नाही .

३) तत्वार्थ श्लोकवार्तिक ही आचार्य उमास्वामींनी रचलेल्या तत्वार्थसूत्र ग्रंथावरील टीका आहे .

४) अष्टसहस्त्री ही स्वामी संमतभद्रांच्या देवागम या ग्रंथावरील टीका असून यात आठ हजार श्लोक आहेत . ही टीका जितकी सुंदर तितकीच गहन आहे .

५) युक्त्यनुशासनालंकार - हा देखील टीका ग्रंथच आहे . आ. संमतभद्राच्या युक्त्यनुशासन स्तोत्रावर लिहिलेली ही टीका आहे .

६) आप्त परीक्षा - 'मोक्षमार्गस्य नेतारम्' या तत्वार्थसूत्रावरील पद्य मंगलाचरणावरील व्याख्यानरू प टीका .

७) प्रमाणपरीक्षा - अन्य दार्शनिकाच्या प्रमाण - स्वरू पावर टीका .

८) पत्रपरीक्षा - गद्यपद्यात्मक तार्किक रचना .

९) सत्यशासनपरीक्षा - ही अंतिम रचना असावी . कारण हा ग्रंथ अपूर्ण आहे .

१०) श्रीपूरपार्श्वनाथ स्तोत्र - एक भक्तीपूर्ण स्तोत्रग्रंथ . त्यांचे सर्वच ग्रंथ दार्शनिक व तर्काधिष्ठित आहेत . त्यांची शैली प्रासादिक , तर्कपूर्ण आणि प्रवाही असल्यामुळे ग्रंथ हातातून सोडवत नाही . पं. अंबादास शास्त्री , पं. सुखलालजी , न्यायाचार्य पं. महेंद्रकुमार , प्रो. ऑफ बौद्धदर्शन , हिंदू विश्वविद्यालय , बनारस , या सर्वांनी आ. विद्यानंदांच्या ग्रंथांची प्रशंसा केली आहे . त्यांनी सर्व विद्वानांना एक
ज्ञानाचे मोठे दालन खुले करू न दिले आहे आणि आदर्श घालून दिला आहे . त्यांचे हे ऋण जैन विद्वान दार्शनिक विसरू शकणार नाहीत .

दहाव्या शतकातील प्रज्ञा-श्रमण

## सिद्धांत चक्रवर्ती आचार्य नेमिचंद्र

"ज्याप्रमाणे चक्रवर्ती सम्राट आपल्या चक्ररू पी अस्त्राने भारताच्या सहा खंडांना स्वत:च्या अधीन करतो तसेच मी आपल्या बुद्धीरू पी चक्राने षट्खंड आगमाची साधना केली आहे." आचार्य नेमिचंद्रांनी स्वत:संबंधी असे म्हटले आहे . त्यांना सिद्धांत चक्रवर्ती ही पदवी मिळालेली आहे . त्यांचे गुरू अभयनंदी हे होते .

आचार्य नेमिचंद्र हे गंगराजाच्या कारकिर्दीत होऊन गेले . गंगराजाचा काळ हा जैनधर्मीयांच्या दृष्टीने सुवर्णकाळच म्हणावा लागेल . त्या काळात अनेक विद्वान आचार्य होऊन गेले आणि अत्यंत महत्वाची ग्रंथसंपदाही याच काळात निर्माण झाली . त्याच काळात गंगराज दुसरा मारसिंह हा प्रसिद्ध राजा झाला . याच्याच काळात त्याचा सेनापती श्री. चामुंडराय हा अत्यंत शूर , वीर , पराक्रमी तसेच अत्यंत धार्मिक आणि अध्यात्मप्रवण होता . त्यानेच म्हैसूरजवळ श्रवण बेळगोळ येथे भ. बाहुबलीची ५७ फूट उंचीची मूर्ती उभी केली .

राजा मारसिंह व सेनापती चामुंडराय हे दोघेही आचार्य नेमिचंद्राचे शिष्य होते व त्यांच्या आग्रहानेच आचार्य नेमिचंद्रांनी ग्रंथरचना केली . चामुंडरायाचे दुसरे नाव गोम्मट ( गोमटा = सुंदर ) होते . त्यावरू न त्यांनी गोम्मटसाराची रचना केली.

भारतीय ज्ञानपीठातर्फे प्रकाशित झालेल्या जैनसिद्धांत कोषमध्ये सिद्धांत चक्रवर्ती आचार्य नेमिचंद्र हे सिद्धांत चक्रवर्ती अभयनंदीचे शिष्य असून आचार्य इंद्रनंदी व वीरनंदी यांचे समकालीन असले तरी ते त्या दोघांना गुरू प्रमाणे मानत . त्यांनी चामुंडरायासाठी गोम्मटसार व श्रीपालासाठी बृहदद्रव्यसंग्रह हा ग्रंथ लिहिला.

आचार्य नेमिचंद्रांनी एकूण ५ ग्रंथ लिहिलेत . *१) गोम्मटसार २) लब्धिसार ३) क्षपणसार ४) त्रिलोकसार आणि ५) द्रव्यसंग्रह*

गोम्मटसार - या ग्रंथासंबंधी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे . एकदा आचार्य नेमिचंद्र सिद्धांत ग्रंथाचा अभ्यास करीत असताना सेनापती चामुंडराय तेथे आले . तेव्हा त्यांनी ग्रंथ बंद केला . चामुंडरायांनी कारण विचारले , तेव्हा गृहस्थाने सिद्धांतग्रंथाचे वाचन करू नये , असे त्यांनी सांगितले . तेव्हा त्यांनी उत्तर दिले की शास्त्राच्या गूढ आशयाचे नीट आकलन झाले नाही तर विपरीत घटना घडण्याचा संभव असतो . पण तत्वज्ञ चामुंडरायांनी पुन: पुन: आग्रह केल्यावर त्यांनी गोम्मटसाराची रचना केली व त्याला आपल्या प्रिय शिष्याचे नाव दिले . गोम्मटसाराचे जीवकांड आणि कर्मकांड असे दोन भाग आहेत . जीवकांडात जीवाच्या विविध अवस्थांचे वर्णन केले आहे . गति , जाति , पर्याप्ति , कषाय , लेश्या , वेद इ. चौदा मार्गणाद्वारे कर्माधीन जीवाच्या उच्चनीय अवस्थांचे वर्णन केले आहे . कर्मकांडात आठ प्रकारची कर्मे , त्यांचे स्वरू प , स्थिती , काल , फलदायक शक्ती इ. जडकर्माच्या अवस्थाचे वर्णन आहे . थोडक्यात या ग्रंथात जीवात्म्याचे स्वरू प , त्यांच्या कर्मजन्य संसारी अवस्था , जीवात्म्याचे अंतीम ध्येय , त्या ध्येयमार्गात येणारे अडथळे व ते कसे टाळावेत याचे मार्गदर्शन केले आहे .

लब्धिसार - यात कर्मापासून मुक्त होण्याचे उपाय सांगितले आहेत . कषाय प्राभृत या ग्रंथाच्या १५ अधिकारातील पच्चीम स्कंध नावाच्या १५ व्या अधिकाराच्या आधारे हा ग्रंथ लिहिला आहे . मोहनीय कर्म हे प्रभावी कर्म असून त्यालाच मिथ्याकर्म असे म्हटले आहे . यापासून मुक्त होण्यासाठी ५ लब्धि सांगितल्या असून त्यातील करणलब्धि प्रमुख आहे . क्षपणसाराचा यातच समावेश आहे .

त्रिलोकसार - करणानुयोगातील हा एक श्रेष्ठ ग्रंथ असून त्यात उर्ध्व- मध्य- अधो या तिन्ही लोकांचे वर्णन आहे . ही रचना भौगोलिक असून ग्रहनक्षत्राच्या भ्रमणकक्षा , त्यामुळे होणारे दिवस-रात्र . निरनिराळ्या प्रकारची मोजमापे , गणनपद्धती इ. विवेचन केले आहे .

बृहद्द्रव्यसंग्रह - या ग्रंथाचे तीन अधिकार आहेत . व ५८ गाथा आहेत . पहिल्या अधिकारात जीव , अजीव , धर्म , अधर्म , काल , आकाश या सहा द्रव्यांचे वर्णन असून यात २७ गाथा आहेत . दुस-या अधिकारात नऊ पदार्थांचे वर्णन ११ गाथेत केले आहे .

तिस-या अधिकारात २० गाथा असून मोक्षमार्ग , निश्चय आणि व्यवहार , ध्यानाचे महत्व , त्यासाठी कोणता मंत्र उपयोगी , याचे वर्णन केले आहे .

या ग्रंथावर ब्रह्मदेवसूरी यांची टीका असून द्यानतराय यांचा हिंदी अनुवाद पं. जवाहरलाल कृत हिंदी टीका प्रसिद्ध आहे .

या सर्व विवेचनावरू न आचार्यांचे सिद्धांत ग्रंथावर असलेले प्रभुत्व दिसून येते . राजाश्रयामुळे त्यांच्या अंगीकृत गुणांना विकसित होण्यास अधिक वाव मिळाला आहे . तत्वजिज्ञासू लोकासाठी व श्रावकासाठी योग्य धर्माचा मार्ग त्यांनी आपल्या ग्रंथाद्वारे दाखविला आहे . म्हणून त्यांची सिद्धांत चक्रवर्ती ही पदवी योग्य वाटते .

आयुर्वेदाचे महान संशोधक

## आचार्य उग्रादित्य

आतापर्यंत वाचलेल्या जैन आचार्यांच्या चरित्रावरू न ते फक्त आत्मकल्याणाच्या मागे लागून फक्त आध्यात्मिक ग्रंथांचीच रचना करीत असावेत अशी कल्पना होण्याचा संभव आहे . पण जैन आचार्यांनी जीवनाच्या सर्व अंगांचा अभ्यास केलेला आहे . लोकांचे आचारविचार , त्यांचे आरोग्य , ज्योतिषशास्त्र , मंत्र , तंत्र , पूजा अर्चा , या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करू न ग्रंथरचना केली आहे. शरीर जर निरोगी नसेल तर नुसत्या अभ्यात्माचा काय उपयोग ? ‘शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्’ शरीर निरोगी तर मन निरोगी . म्हणून आचार्य उग्रादित्यांनी आयुर्वेदाचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे . त्या काळी मांसाचादेखील वैद्यकशास्त्रात उपयोग केला जात होता . उग्रादित्याचार्यांनी मांसाहाराविरूद्ध दंड थोपटून वनस्पतींनी देखील रोग चांगल्या प्रकारे बरे होऊ शकतात , हे सिद्ध केले आहे . आणि त्यासाठी ‘कल्याणकारक’ या ग्रंथाची रचना केली आहे . हा एकच ग्रंथ त्यांचा मोठेपणा सिद्ध करण्यास पुरेसा आहे .

इतर आचार्याप्रमाणे यांनीही आपला परिचय आपल्या ग्रंथात दिलेला नाही . पण वेगवेगळ्या ग्रंथातून आलेल्या उल्लेखावरू न त्यांच्यासंबंधी थोडीबहुत माहिती मिळते . त्यावरू न त्यांचे गुरू आ. श्रीनंदी असावेत व ग्रंथरचना रामगिरी पर्वतावर केली असावी अशी कल्पना येते. पण या रामगिरी संबंधीसुद्धा मतभेद आहेत . नागपूर जवळच्या रामटेकला देखील रामगिरीच म्हणतात आणि कलिंगा देशातही रामगिरी आहे . श्री नंदलाल डे आणि पं. भुजबळी शास्त्री हे नागपूरजवळच्या रामटेक हाच रामगिरी मानतात व तेथील देवालयातच त्यांनी 'कल्याणकारक' ग्रंथाची रचना केली आहे , असे म्हणतात .

उग्रादित्याचार्यांनी आपल्या गुरू चे नाव श्रीनंदी असे सांगितले आहे . त्यांचा काळ वि. सं. ७४९ हा मानला असून ते उज्जैनचे पट्टाधीश होते . आचार्य वसुनंदींनी आपल्या श्रावकाचारात त्यांचा उल्लेख केला आहे . आ. उग्रादित्यांनी कल्याणकारकच्या प्रशस्तीमध्ये पूज्यपाद , समंतभद्र , पावस्वामी , सिद्धसेन , दशरथगुरू , मेघनाथ आणि सिंहसेन यांचाही उल्लेख केला आहे . श्री नृपतुंग वल्लभेंद्राच्या राजसभेत औषधयोजनेमध्ये मांसाचा उपयोग करण्याची मुळीच जरू र नाही , असे अभिमत ठामपणे मांडले आहे आणि खास त्यासाठीच कल्याणकाराची रचना झाली आहे . राजा अमोघवर्ष १ला , त्यालाच नृपतुंग , वल्लभेंद्र , महाराजाधिराज अशा पदव्यांनी गौरविले आहे . अमोघ वर्षाच्या राज्यारोहणाचा काळ ७३६ हा आहे . अमोघवर्ष जिनसेनाचार्यांचा शिष्य होता . आचार्य जिनसेनाच्या नखाचे किरण जलधारेसारखे सर्वत्र पसरत असून त्यामुळे त्यांचे चरण कमलासारखे दैदिप्यमान भासत होते आणि त्यांच्या पदधुलीमुळे जेव्हा राजा अमोघवर्षाच्या मुकुटातील रत्न धूलिधुसरीत होतात तेव्हा राजाला मी पवित्र झालो असे वाटत होते .

राजा अमोघवर्ष १ ला आणि राजा कवी विष्णूवर्धन ५ वा हे समकालीन होते आणि त्याच काळात उग्रादित्याचार्य होऊन गेलेत हे वेगवेगळ्या पुराव्यांनी सिद्ध झाले आहे . उग्रादित्याचार्यांचा हा ग्रंथ दोन प्रकारात विभागला आहे . १) रोग होऊ नयेत म्हणून प्रतिकारात्मक औषधे . २) आणि रोग झाल्यावर करण्यात येणारी उपाय योजना . ग्रंथाच्या आरंभी त्यांनी आयुर्वेदाचा जोरदार पुरस्कार केला आहे . या ग्रंथात २५ परिच्छेद असून परिशिष्ठात अरिष्टाध्याय आणि हिताध्याय हे दोन अध्याय जोडले आहेत . २५ परिच्छेदाचा विषयानुक्रम असा .

१)स्वास्थ्यसंरक्षणधिकार - यात ४९ पद्य असून वैद्यकशास्त्राचे थोडक्यात वर्णन करू न शकुन निर्मित आणि सामुद्रिकाद्वारे रोगपरिक्षेचे वर्णन आहे .

२) गर्भोत्पत्तिलक्षण - यात ६० पद्य आहेत. गर्भाच्या संरक्षणासाठी गर्भाधानक्रम , गर्भपोषण आणि गर्भाची वाढ या विषयांची माहिती दिली आहे .

३) सूत्रव्यावर्णन - यात ६९ पद्य आहेत. अस्थि , संधि , मांसरज्जू , मर्मस्थान , दंत , वात , मल-मूत्र , औषध , स्थूलशरीर , क्षीणशरीर , मध्यम शरीर , वात , कफ-पित्त या गोष्टींचा उहापोह केला आहे .

४) धान्यादि गुणाधिकार - यात ४८ पद्य आहेत . काल वर्णनानंतर वेगवेगळ्या ऋतूत निर्माण होणारे दोष आणि विशेष धान्याचे गुणवर्णन आहे .

५) अन्नपानविधी वर्णनाधिकार - यात ४५ पद्य आहेत. जल , यवागू , मंड , मृद्‌गयूष , दुग्ध , दधि , तक्र , नवनीत , घृत , तेल या पदार्थांच्या गुणधर्माचे विवेचन केले असून वेगवेगळ्या पशूंच्या मूत्राचे देखील गुणधर्म सांगितले आहेत .

६) रसायनविधी - यात ४५ पद्ये आहेत . उद्‌वर्तन , स्नान , तांबूलभक्षण , पादाभ्यंग , ब्रह्मचर्य , निद्रा , गोधूमचूर्ण , त्रिफळा , यष्टिचूर्ण , विडंगसार , नागबल , वाकुचीरसायन , वज्रादिरसायन , चंदामृतरसायन यांचे निरू पण केले आहे .

७) व्याधिसमुद्देश - यात ६३ पद्यात रोगाच्या उत्पत्तीचे कारण वर्णन करू न रोग्याची शय्या , शयनविधि , दिनचर्या सांगून उपचार व औषधाचे गुणधर्म सांगितले आहेत .

८) वातारोगाधिकार - ६३ पद्ये असून वातरोगाचे विवेचन केले आहे .

९) पित्तरोगाधिकार - १०३ पद्यामध्ये पित्तव्याधींचे वर्णन आहे . तसेच ते नाहीसे करण्याचे उपायही आहेत .

१०)कफरोगाधिकार - यात २८ पद्ये आहेत . विविध प्रकारच्या कफरोगांची आणि त्यावरील उपचारांची चर्चा केली आहे .

११)महामायाधिकार - यात १८० पद्यामध्ये
कृष्ठरोगासारख्या महान रोगाची माहिती आहे .

१२) या परिच्छेदात १३६ पद्य असून वात - पित्तजन्य महाव्याधीचा व त्यावरील उपचारांचा निर्देश केला आहे .

१३-१४-१५-१६-१७- यात किरकोळ रोगांची माहिती आहे . तेराव्या परिच्छेदात ९१ , चौदाव्यात ९१ , पंधराव्यात २९२ श्लोक असून भगंदर , उपदंश , शोध , इलीपद , वल्मिकीपद , गलगंड , नाडीव्रण , टाळूरोग , जिव्हारोग , नेत्ररोग , शिरोरोग , यांचे वर्णन आहे . १६ व्या अधिकारात १०१ पद्य असून यात श्वास , तृष्णा , मूत्रावरोध या रोगांची माहिती आणि उपाय आहेत . सतराव्यामध्ये त्रिदोषाने उत्पन्न होणा-या लहानसहान रोगांची व उपायांची माहिती आहे .

१८) बालग्रहभूत तंत्राधिकार - बालकांच्या रोगासंबंधी माहिती व उपचार . पद्यसंघ्या १३७ .

१९) विषरोगाधिकार - विषचिकित्सापद्धतीचे वर्णन .

२०) शास्त्रसंग्रहाधिकार - ९४ पद्यामध्ये धातू आणि विविध प्रकारच्या शारीरिक रोगावर उपचारपद्धती .

२१) कर्मचिकित्साधिकार - यात ६६ पद्य असून वमन , विरेचन इ. चिकित्सेचा विचार केला आहे .

२२) भैषज्यकर्मोपद्रव चिकित्साधिकार - यात १७२ पद्य आहेत . वमन , विरेचन , परिस्राव , बस्ति इ. विधींची माहिती .

२३) सर्वोषधकर्मव्यापच्चिकित्साधिकार - यात १०९ पद्ये आहे . विभिन्न प्रकारच्या वमन , विरेचन क्रियासंबंधीच्या प्रयोगाची माहिती .

२४) रसरसायनसिद्धयाधिकार - यात ५६ पद्य आहेत . रसाचे महत्व , प्रकार , रसशुद्धी तसेच पा-यापासून तयार होणारे रसायन इ. चे वर्णन यात आहे .

२५) कल्पाधिकार - यात ५७ पद्य आहेत . हरितिकी
( हरडा ) त्रिफळा शिलाजित् , पायस , भल्लातपाषाणकल्प , मृत्तिकाकल्प , एरंड कल्प , क्षारकल्प इ. संबंधी विस्तृत माहिती दिली आहे .

परिशिष्टामध्ये अरिष्टाधिकारात अरिष्ट-संकटांचे वर्णन करू न हिताहिताधिकारात पथ्य-अपथ्य याचा विचार केला आहे .

उग्रादित्याचार्यांनी कल्याणकारक हा ग्रंथ लिहून आयुर्वेदात मोठी भर घातली आहे . त्यात त्यांनी आयुर्वेदातील वात-पित्त-कफ या त्रिदोषांचा विचार केलाच आहे पण संभाव्य अशा सर्व रोगांचा व त्यांच्या उपचारांचा समग्र विचार केला आहे . एवढेच नव्हे तर मांसाचा उपयोग केल्याशिवाय रोगचिकित्सा होऊच शकत नाही , हा जो जुन्या वैद्यांचा हट्टाग्रह होता तो या ग्रंथामुळे समूळ उखडला गेला आहे . म्हणून आचार्य उग्रादित्याचे भारतीय वैद्यकशास्त्रावर मोठेच ऋण आहे .

# महान गणितज्ञ - आचार्य महावीर

जैन आचार्यांनी अध्यात्माचा अभ्यास करू न सिद्धांतशास्त्राची तर रचना केलेलीच आहे . पण समाजजीवनाचा अभ्यास करू न त्यांना जीवनोपयोगी अशा इतर शाखांचीही ग्रंथसंपदा निर्माण केली आहे . त्यापैकी आचार्य महावीर हे एक उल्लेखनीय होऊन गेले . गणिताविषयी जेव्हा विषय निघतो , तेव्हा महावीराचार्यांचे नाव आधी व आदरपूर्वक घेतले जाते . जैन गणिताला योग्य स्वरू प देण्याचे काम त्यांनी केले आहे .

त्यांच्या जीवनाविषयी , गुरू परंपरेसंबंधी फारशी माहिती मिळत नाही . महावीराचार्यांनी आपल्या गणितसारसंग्रहामध्ये अमोघवर्ष नृपतुंगाची प्रशंसा केलेली आहे . त्यावरू न त्यांच्या काळासंबंधी थोडीशी कल्पना येते . त्यांच्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत आणि कन्नड आणि तामिळमध्ये लिहिलेली त्यावरील टीका वाचून ते म्हैसूर भागातीलच एखाद्या गावात रहात असावे असा अंदाज आहे . दक्षिण भारतातच गणित - विज्ञानाचा विकास करण्याचा त्यांनी प्रयत्न केला . पूर्ववर्ती आचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथावर त्यांनी बरेच संशोधन आणि वाढ केली . नवीन प्रश्नांचा त्यात समावेश केला . दीर्घवृत्ताचे क्षेत्रफळ काढणे , तसेच द्विघातीय समीकरण इ. प्रकारासंबंधी माहिती दिली . शून्याला भाग देण्याची प्रक्रिया शोधून काढली आणि कोणत्याही संख्येला शून्याने भाग दिला असता संख्येत बदल होत नाही हे सिद्ध केले .

ते अमोघवर्ष राजाच्या आश्रयाला राहिले असावेत असा अंदाज आहे . महावीराचार्यांनी अमोघवर्षासंबंधी सहा श्लोक लिहिलेले आहेत . त्यात असे म्हटले आहे , “आपल्या प्रियजनांच्या हिताविषयी दक्ष असणारा आणि वनस्पतीचे देखील , दुष्काळ आणि रोगापासून रक्षण करणारा तो अमोघवर्ष धन्य आहे . ज्याचे मनोव्यापार अग्निपुंज बनून पापरू पी शत्रूंना दग्ध करतात , ज्याने सर्व जगाला नियंत्रित केले आहे , जो सदा विजयी आहे , सर्वांगसुंदर मदनाप्रमाणे जो तेज:पुंज आहे , जो नावानेच नव्हे तर खरोखरच चक्रिकाभंजन
( जन्ममरणाचा नाश करणारा ) आहे , ज्ञानसरितांचा अधिष्ठाता असून सच्चारित्र्याची वज्रासारखी कठोर मर्यादा पालन करणारा आहे . जैनधर्मरू पी रत्न , हृदयी धारण करणारा , स्याद्वादरू पी न्यायशास्त्राचा प्रणेता अशा अमोघवर्षाचे राजाचे शासन चिरकाल राहो.” अमोघ वर्षाचा राज्यकाल इ. स. ९ व्या शतकाचा पूर्वार्ध आहे . हाच काल महावीराचार्याचाही मानावा लागेल . अमोघ वर्षाच्या काळातच गणितसारसंग्रहाची रचना केली आहे .

गणितसार - संग्रहात नऊ अध्याय आहेत पहिला संज्ञाधिकार असून त्यात गणितशास्त्राची प्रशंसा , क्षेत्रपरिभाषा , कालपरिभाषा , धान्यपरिभाषा , सुवर्ण-रजत , परिभाषा , लोहपरिभाषा , परिकर्मनामावली , स्थानमान , संख्यासंज्ञा यांचे वर्णन आहे .

दुसरा अधिकार परिकर्मव्यवहार नावाचा असून त्यात गुणाकार , भागाकार , वर्ग , वर्गमूळ , घन , घनमूळ , संकलित आणि व्युत्कलित गणिताचे उदाहरणासहित विवेचन केले आहे .

तिसरा अधिकार कलासवर्ण हा असून यात अनेक प्रकारचे भागाकार , विविध प्रकारचे संकलित , व्युत्कलित , वर्गमूळ , घनमूळ , भागजाति , प्रभागजाति , भागाभागजाति , भागानुबंध जाति , भागापवाह जाति , भागमात्रिजाति , यांचे उदाहरणासहित वर्णन केलेले आहे .

चवथ्या अधिकाराचे नाव प्रकीर्ण व्यवहार असून यात विविधांचे विविध प्रयत्नांचे वर्णन केलेले आहे . भागाकार , शेषजाति , मूलजाति , शेषमूलजाति , द्विरग्रशेषमूलजाति , अंशमूलजाति , भाग , सवर्गजाति , अनाधिक अंशवर्ग जाति , मूळमिश्रजाति , भिन्नसदृशजाति , इ. प्रकारचे गणित यात समाविष्ट आहे .

पाचवा अधिकार त्रैराशिक व्यवहारसंज्ञक नावाचा आहे . यात अनुक्रमे त्रैराशिक , व्यस्त त्रैराशिक , व्यस्त पंचराशिक , व्यस्त सप्तराशिक , व्यस्त नवराशिक , भांड , प्रतिभांड आणि क्रयविक्रयाची माहिती दिली आहे .

सहावा अधिकार मिश्रक व्यवहारासंबंधी आहे . यात संक्रमण , विषम संक्रमण , पंचराशिक विधि , वृद्धि विधान , प्रक्षेपक , कुट्टीकार , वल्लीका कुट्टीकार , विषम कुट्टीकार , सकल कुट्टीकार , सुवर्ण कुट्टीकार , विचित्र कुट्टीकार आणि श्रेढीवद्ध संकलित गणिते उदाहरणासाठी दिलेली आहेत .

सातव्या अधिकाराचे नाव क्षेत्रगणित व्यवहार हे आहे . यात क्षेत्रफळासंबंधीची वेगवेगळी उदाहरणे आहे . व्यावहारिक गणित , सूक्ष्म गणित , इतर व्यवहार आणि पैशाचिक व्यवहार गणिताची उदाहरणे दिली आहेत .

आठवा अधिकार खात व्यवहार नावाचा असून यात सूक्ष्म गणित , चित्तिगणित आणि क्रकचिका व्यवहारगणिताचे वर्णन आहे .

नवव्या अधिकाराचे नाव छायाव्यवहार असून यात छायासंबंधी विविध प्रकारची गणिते उदाहरणासहित दिलेली आहेत .

अशा प्रकारे गणितासंबंधी अनेक प्रकारचा विचार या ग्रंथात केलेला आहे .

प्रभावशाली व्याकरणकार

## शाकटायन पाल्यकीर्ती

शाकटायन पाल्यकीर्ती हे महान व्याकरणकार होऊन गेले . त्यांच्या मताचा उल्लेख पाणिनीने देखील आपल्या अष्टाध्यायीत केलेला आहे . जैन आचार्यांनी अध्यात्माबरोबर जीवनाच्या सर्व अंगांचा विचार करू न आपली साहित्य निर्मिती केली आहे . त्यापैकी आचार्य पाल्यकीर्तीनी व्याकरणशास्त्रावर ग्रंथ लिहून जैन साहित्यात मोलाची भर घातली आहे .

एक शाकटायन पाणिनीच्या आधी साडेसहाशे वर्षे अगोदर होऊन गेले . पण हे शाकटायन त्यापेक्षा वेगळे आहेत . यांनी
स्वोपज्ञ अमोघवृत्ती आणि शाकटायन शब्दानुशासन या ग्रंथाची रचना केली आहे . अमोघवृत्तीच्या आरंभी लिहिलेल्या प्रशस्तीमध्ये स्वत:चा शाकटायन असाच उल्लेख केला आहे . यक्षवर्माने शाकटायन चिंतामणी टीकेमध्ये शाकटायन हेच शब्दानुशासन या ग्रंथाचे लेखक आहेत हे मान्य केले आहे . शाकटायन यांचेच नाव पाल्यकीर्ती असेही आहे . वादिराजसूरीने आपल्या पार्श्वनाथचरितात तसा उल्लेख केला आहे . त्यात असे म्हटले आहे , "त्या महान तेजस्वी अशा पाल्यकीर्तीचे काय वर्णन करावे ? त्यांच्या श्रीपदाचे नुसते श्रवणदेखील श्रोत्याला वैय्याकरण बनविते." शुभचंद्राने आपल्या पार्श्वनाथ चरित्रात पाल्यकीर्तीला शाकटायन सूत्राचा कर्ता मानले आहे . ते यापनीय संप्रदायाचे विद्वान होते .

त्याचे गुरू  शिवार्य हेही संप्रदायाचे होते . शाकटायनाने आपल्या गुरू परंपरेचा उल्लेख केला नाही . अमोघवर्ष राजाचे पिता प्रभूतवर्ष अथवा तिस-या गोविंद राजाने एका दानपत्राद्वारे , शके७३५ साली अर्क्कीर्ती मुनींना मान्यपूर नावाचे गाव जिनेंद्रभवनासाठी दान केल्याचा उल्लेख आलेला आहे . हे दानपत्र म्हैसूर जिल्ह्यातील कदंब गावी सापडले आहे . अर्क्कीर्ती हे यापनीय नंदीसंघाचे पुन्नागवृक्ष मूलगणापैकी होते . अर्क्कीर्तीचे गुरू  विशालकीर्ति आणि त्यांच्या प्रगुरू चे नाव श्रीकीर्ति होते . या सर्वावरू न अर्क्कीर्ति हेच पाल्यकीर्तीचे गुरू  असावे .

पाल्यकीर्ती शाकटायनाच्या काळासंबंधी फारसा मतभेद आढळत नाही . त्यांचा काळ इ. सन. १०२५ च्या पूर्वीचा असावा .

( संदर्भ - संस्कृत काव्यके विकासमें जैन कवियोंका योगदान . डॉ. नेमिचंद जैन भारतीय ज्ञानपीठ , पृ. १७४ )

मि. राईस यांनी चिदानंद कवीच्या मुनिवंशाभ्युदय नावाच्या कन्नड ग्रंथातून एक पुरावा दिला आहे . हा कवी म्हैसूरच्या चिक्कदेव राजाच्या काळात ( इ. स. १६७२-१७०४ ) होऊन गेला असे त्यात म्हटले आहे .

"त्या मुनीने आपल्या बुद्धिरू पी मंदराचलाने श्रुतरू पी समुद्राचे मंथन करू न व्याकरणरू पी अमृत यशस्वीरीत्या काढले आहे." या शाकटायनाने अमोघवृत्ती नावाची टीका , ज्याला मोठे शाकटायन म्हणतात , लिहिली आहे . त्यात १८,००० श्लोक आहेत . व्याकरणाची सूत्रे तयार करू न त्यांनी मोठेच पुण्य संपादन केले आहे.

शाकटायनाचा शब्दानुशासन हा ग्रंथ अत्यंत महत्वाचा आहे . त्यात चार अध्याय असून प्रत्येक अध्यायात चार पद आहेत . प्रथम अध्यायाच्या प्रथम पादामध्ये १८१ सूत्र असून दुस-या पादात २२३ सूत्र , तिस-यात १९५ सूत्र आणि चवथ्यात १३२३ सूत्र आहेत . दुस-या अध्यायाच्या पहिल्या पादात २२९ सूत्र , दुस-यात १७२ , तिस-यात ११३ व चौथ्यात १४६ सूत्र आहेत . तिस-या अध्यायात पहिल्या पादामध्ये २०१ , दुस-यात २२७ , तिस-यात १८१ आणि चवथ्यात १४६ सूत्र आहेत . चवथ्या अध्यायाच्या पहिल्या पादात २७१ , दुस-यात २६१ , तिस-यात २८९ आणि चौथ्यात १८६ सूत्र आहेत . एकूण सूत्रांची संख्या ३,२३६ आहे . स्वत: शाकटायनाने यावर अमोघवृत्ती नावाची टीका लिहिली असून इतरांनीही टीका लिहिल्या आहेत . हा ग्रंथ प्रत्याहार शैलीमध्ये लिहिला आहे . याचे वैशिष्ट्य असे की यात 'लग्' सूत्राचा समावेश केलेला नाही आणि 'ल्' पूर्वसूत्रातच ठेवले आहे . यात सर्ववर्णाच्या प्रथमादि अक्षराच्या क्रमाने वेगळे वेगळे प्रत्याहार सूत्र लिहिले आहेत . यात फक्त ३८ प्रत्याहार आहेत तर पाणिनीच्या व्याकरणात ४१-४२ अथवा ४४ प्रत्याहार सूत्रे सापडतात .

यांच्या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे की शाकटायनाच्या प्रत्याहार सूत्राचा संग्रह पाणिनीसारखा नसून त्यात बरीच सुधारणा केली आहे . उदा. शाकटायनाने 'लृ' स्वराला मान्यता दिली नाही . त्याचा समावेश 'ऋ' वर्गात केला आहे . तसेच विसर्ग , जिव्हामूलीय आणि उपध्मानीय यांचा समावेश व्यंजनामध्ये केला आहे . वास्तविक पहाता अनुस्वार , मकार किंवा नकारजन्य असल्यामुळे व्यंजनातच समाविष्ट होतात . विसर्ग कुठे सकार कुठे रेफमुळे उत्पन्न होतो . म्हणून तोही व्यंजनात समाविष्ट होतो . जिव्हामुलीय आणि उपध्मानीय हे अनुक्रमे 'क', 'ख', तसेच 'प', 'फ' च्या पूर्वी विसर्गाचेच विकृत रू प आहे . अशा प्रकारे शाकटायनाने अनुस्वार , विसर्ग आदीची मूलरू पे

विचारात घेऊन प्रत्याहारसूत्रात समाविष्ट करू न ती व्यंजनेच आहेत हे सिद्ध केले आहे . यात संज्ञाविषयक सूत्रे कमी आहेत . प्रकृतिभाव प्रकरणाला निषेध संधिप्रकरण म्हटले आहे . त्यांनी स्वरान्त , व्यंजनात शब्दाच्या साधुत्वामध्ये लाघवप्रक्रियेला स्थान दिले आहे . स्त्रीप्रत्ययान्त शब्दांच्या साधुत्वाचा त्याग केला आहे . उदा. दीर्घपुच्छी , कवरपुच्छी , मणिपुच्छी आदि शब्दांचा त्याग केला आहे.

कारकांची व्याख्या यात केलेली नाही आणि कारकांची लक्षणेही सांगितली नाहीत . समासप्रकरणात बहुव्रीही समासाचेच विवेचन केलेले आहे . तद्धित , कृदन्त यांचाही यात समावेश आहे .

राजशेखरने पाल्यकीर्तीची वचने उद्धृत केलेली आहेत . त्यावरू न त्यांचा एखादा काव्यग्रंथही असावा असे वाटते . त्यांनी म्हटले आहे . "वस्तुचे स्वरू प कसेही असो त्याची सरसता ही कवीच्या स्वभावावर अवलंबून असते." 'यथा तथा वास्तु वस्तुनो स्वरू पं , वक्तृप्रकृतिविशेषायता तु रसवत्ता ' तथा च समर्थ रक्तः स्तौति तं विरक्तो विनिन्दति मध्यस्थस्तु तत्रोदास्ते इति
पाल्यकीर्तिः'’

याशिवाय स्त्रीमुक्तीप्रकरण व केवलभुक्ती प्रकरण असे दोन ग्रंथही त्यांनि लिहिले आहेत . परंतु व्याकरणविषयक शब्दानुशासन हा एकच ग्रंथ पाल्यकीर्तीची महत्ता सिद्ध करण्यास पुरेसा आहे .

अद्वितीय ज्योतिष्यशास्त्रकार

## आचार्य भट्टेवोसरि

आचार्य भट्टवोसरि हे ज्योतिष आणि निमित्तशास्त्राचे रचयिता आहेत . ते दिगंबराचार्य दामनंदीचे शिष्य होते . त्यांनी स्वत:संबंधी लिहिताना म्हटले आहे की , गुरू भट्टवोसरि आपले गुरू दामनंदी यांच्याकडून 'आय' चे रहस्य समजून घेऊन आय विषयक सर्व ग्रंथाचे साररू प म्हणून या ग्रंथाची रचना केली आहे . या ग्रंथावर आचार्यांनी स्वत:च टीका लिहिली आहे . त्यात निमित्तीकालाचा उल्लेख नाही . त्यांच्या ग्रंथातूनच त्यांच्या स्वत:चा परिचय मिळतो .

प्रत्येक संधीच्या सुरवातीला त्यांनी एक संस्कृत श्लोक घातला आहे . त्यावरू न त्यांची माहिती मिळते . प्राच्य उदीच्य ब्राह्मण कुलात नारायण नावाची व्यक्ती होऊन गेली . त्याचा पुत्र दुर्लभराज व दुर्लभराजाचा पुत्र भट्ट ओसरि होता . भट्ट ओसरिच्या भावाचे नाव कोक असे होते . ओसरिच्या आय-ज्ञान-तिलक ग्रंथाच्या पाचव्या प्रकरणाच्या शेवटी या कोकचा उल्लेख आलेला आहे . भट्ट ओसरिच्या आय-ज्ञान-तिलकच्या पात प्रकरणामध्ये अनहिलपाटणचा उल्लेख आहे , यावरू न सुग्रीवादी आचार्यांनी रचलेल्या महाशास्त्राचे अध्ययन दामनंदिनी केले व त्यांनी ते सर्व ज्ञान आपला शिष्य ओसरि याला दिले . ते दिगंबर आचार्य असल्याचा उल्लेख मिळतो . ते मंत्राचा अभ्यास करणारे , बुद्धिमान आणि विरक्त होते .

पं. जुगलकिशोर मुख्तार म्हणतात की , वोसरि भट्टाचा श्रवणबेळगोळच्या शिलालेख नं. ५५ मध्ये उल्लेख केला आहे . यांनीच वादविवादपटू विष्णुभटाचा वादात पराभव केला होता . त्यांचे गुरू दामनंदी प्रभाचंद्राचार्याचे सधर्मी असून भोजराजा त्यांना पूज्य मानत होता , असाही उल्लेख सापडतो . विष्णुभटाच्या पराजयाचा ओसरिच्या मनावर परिणाम झाल्यामुळे ओसरिने जैनधर्माची दीक्षा घेतली . ओसरि हे भोज राजाच्या समकालीन होते . इ. स. ११ व्या शतकाच्या उत्तरार्धात त्यांनी ग्रंथाची रचना केली . आयज्ञानाचा प्रसार १३ व्या शतकापर्यंत होता .

आयज्ञानतिलक ग्रंथात एकूण ४१५ गाथा आहेत . व २५ प्रकरणे आहेत . प्रश्न-शास्त्राच्या दृष्टीने ती फार महत्वाची आहेत . त्यात ध्वज , धूम , सिंह , गज , खर , श्वान , वृष आणि ध्वांक्ष या आठ आयाद्वारे प्रश्नफलांचे सुंदर विवेचन केले आहे . स्थिरचक्र आणि चलचक्रादींची रचना करू न वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत . यात खालील प्रकरणे आहेत .

१) आयस्वरू प - आठ आयांचे स्वरू प , युग आणि आकृतींचे विश्लेषण यात केलेले आहे . यात ३४ गाथा आहेत .

२) पातविभाग - रू द्ध , रुद्ध-विमुक्त , रुद्ध-गृहीत-विमुक्त , संस्थान , अनुकूल , प्रतिकूल , चलित , अभिमुख , पूर्वमुख , अंत्तरित इ. १६ पातांचे विवरण करू न त्यांच्या आयरू प अक्षराचे विश्लेषण केले आहे . यात ३४ गाथा आहेत .

३) आयावस्था - १९ गाथामध्ये मित्र , शुभ , अशुभ , रिपु इ. च्या संबंधातून 'आय' अवस्थाचे वर्णन केले आहे .

४) ग्रहयोग - यात २८ गाथा आहेत . ग्रहाचे सौम्य व पाप असे दोन भेद केले आहेत . या दोन्ही प्रकारच्या ग्रहाचे आयवर्ण आणि शुभाशुभ फलांचे विवेचन केले आहे .

५) पृच्छाकार्थज्ञान - १६ गाथामध्ये प्रश्नकर्त्याची चर्या , हालचाली , दृष्टी आणि वार्तालाप यावरू न आयाचे विवेचन केले आहे .

६) शुभाशुभ - यात १७ गाथा आहेत यात शुभाशुभ वर्णाद्वारे फल सांगितले आहे .

७) लाभालाभ - यात १० गाथा आहेत . यात प्रश्नकर्त्याच्या प्रश्नानुसार आय निश्चित करू न लाभालाभ फलाचे वर्णन केले आहे .

८) रोग निर्देश - यात २१ गाथा आहेत . रोगासंबंधी प्रश्नांची उत्तरे दिली आहेत .

९) कन्यापरीक्षण - यात ११ गाथातून विवाहाच्या दृष्टीने कन्येची परीक्षा कशी करावी , याचे वर्णन आहे .

१०) भू-लक्षण - २५ गाथांमध्ये प्रश्नानुसार कशा प्रकारची भूमी कुल गोत्र , धन वृद्धी करणारी असेल , कोणती हानीकारक असेल याचे वर्णन केले आहे .

११) परिज्ञान - यात ९ गाथा आहेत . प्रश्नकर्त्यांच्या प्रश्नाच्या अक्षरावरू न गर्भासंबंधी गुप्त प्रश्नांची उत्तरे दिली आहेत .

१२) विवाह - फक्त पाच गाथामध्ये विवाहसंबंधीच्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत .

१३) गमनागमन - यात ९ गाथा आहेत . परदेशात किंवा लांब गेलेल्या व्यक्तीच्या आगमनासंबंधी प्रश्नांची उत्तरे दिली आहेत .

१४) परिचित ज्ञान - ५ गाथामधून कोणता मनुष्य शत्रु किंवा मित्राचे रू प प्राप्त करील किंवा कोणापासून लाभ व नुकसान होईल या संबंधीच्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत .

१५) जय-पराजय - १३ गाथामधून शत्रूच्या आक्रमणाचे वेळी जय मिळेल किंवा नाही आक्रमण केव्हा करावे यासंबंधी प्रश्नांची उत्तरे दिली आहेत .

१६) वर्षालक्षण- यात २८ गाथा आहेत . यात पावसासंबंधीच्या प्रश्नांची उत्तरे आहेत .

१७) अर्थकांड - यात २१ गाथा असून त्यात तेजीमंदीचा विचार केला आहे .

१८) नष्टपरिज्ञान - यात ३१ गाथा असून , हरवलेल्या वस्तु , चोरी यासंबंधीचा विचार केला आहे .

१९) तपोनिर्वाह परिज्ञान - यात ७ गाथा असून संसारातून विरक्त होणारी व्यक्ती आपले वैराग्यपूर्ण जीवन व्यवस्थित पार पाडू शकेल की नाही , याचा विचार केला आहे .

२०) जीवितमान - सात गाथांमधून ग्रहदशेतून आयुष्य किती असेल , याची माहिती दिली आहे .

२१) नामाक्षरादेश - या प्रकरणात ११ गाथा आहेत . दानाशिवाय धन , चंद्राशिवाय रात्र शोभत नाही , तसेच नामाशिवाय वस्तु , व्यक्ती शोभत नाही . म्हणून प्रश्नातील अक्षरावरू न नावाचे वर्णन केले आहे .

२२) प्रश्नाक्षर संख्या - यात ११ गाथा आहेत . प्रश्नातील अक्षरांची गणना करू न शुभाशुभ फल सांगितले आहे .

२३) संकीर्ण - १६ गाथामधून वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची प्रक्रिया सांगितली आहे .

२४) काळ - सात गाथामधून प्रश्नांची फले कधी मिळतील , यासंबंधीचा उहापोह केला आहे .

२५) चक्रपूजा - यात ५ गाथा असून शेवटी १२ पद्यातून स्तुति लिहिली आहे . शेवटी १२ मंत्रदेखील दिले आहेत .

अशा प्रकारे विचारलेल्या प्रश्नात किती अक्षरे आहेत त्यावरू न त्याचे काय फल मिळू शकेल , याचे सविस्तर वर्णन केलेले आहे . प्रश्नकर्ता हा शारीरिक व मानसिकदृष्ट्या शुद्ध पवित्र असला पाहिजे . तनमनाच्या शुद्धीबरोबरच शेवटी मांत्रिक शुद्धीचे विवेचन केले आहे . प्रश्नशास्त्राच्या दृष्टीने हा ग्रंथ अतिशय महत्वाचा आहे . या ज्योतिष्यासंबंधीच्या ग्रंथामुळे आचार्यांनी जैन साहित्यात मोलाची भर घातली आहे .